म. ग्रं. स. ठाणे
विषय इतिहास
सं. नं. ९८
९१८३९

लेखकः—

श्रीयुत भास्करराव जाधव

M. A. L L. B

M. L. A.

# मराठे आणि त्यांची भा.

प्रकाशकः—

रामचंद्र बाबाजी जाधव

प्रो० दासराम बुकडेपो

महाद्वार रोड कोल्हापूर.

REFBK-0004459

# आमची इतर पुस्तके.

| | किंमत रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| १ सुलभ वास्तु शास्त्र | २ | ८ | ० |
| २ मोटार कशी हांकावी | १ | ० | ० |
| ३. जलसा शिक्षक | १ | ४ | ० |
| ४ महात्मा जोतीराव फुले यांचे चरित्र | १ | ४ | ० |
| ५ संकल्प सामर्थ्य | ० | १२ | ० |
| ६ मानस शास्त्र परिचय | ० | १२ | ० |
| ७ इच्छापूर्ति | १ | ० | ० |
| ८. प्रिशाश्च | ० | १२ | ० |
| ९ प्रतापसिंह महाराज यांचे चरित्र | २ | ० | ० |
| १० चावडीतील बैठक | ० | ४ | ० |
| ११ वाड्यातील भूत | ० | ६ | ० |
| १२ हाय गे विलासिनी | ३ | ४ | ० |
| १३ टंटा शास्त्री पराने | १ | ० | ० |
| १४ हिंदु आणि ब्राह्मण | ० | ६ | ० |


१ आमचेकडे शिलाईची सर्व तऱ्हेची पुस्तके मिळतात.

१ आमचेकडे कायद्याची सर्व प्रकारची पुस्तके मिळतात.

१ आमचेकडे धार्मिक ग्रंथ पोथ्या मिळतात.

१ आमचेकडे भारतगौरव ग्रंथ मालेची पुस्तके मिळतात.

१ आमचेकडे सुरस ग्रंथ मालेची सर्व पुस्तके मिळतात.

१ आमचेकडे सर्व प्रकारची इंग्रजी मराठी शालोपयोगी पुस्तके मिळतात. दासराम बुकडेपो कोल्हापूर.

लेखक—
श्रीयुत भास्करराव जाधव
एम्. ए. एल्. एल्. बी.
एम्. एल्. ए.

# मराठे आणि त्यांची भाषा.

REFBK-0004459

शिवशक २५९

सन १९३२.

प्रकाशक—
रामचंद्र बाबाजी जाधव
प्रोप्रायटर—दासराम बुक डेपो
महाद्वार रोड कोल्हापूर.

किंमत
४८

मुद्रकः- आण्णा दादा पाटील मा. श्रीसुदर्शन प्रेस
विल्सनरोड. लक्ष्मीपुरी कोल्हापूर.

# प्रस्तावना.

" मराठा " हा शब्द उच्चारतांच नानाप्रकारचे विचार मन:चक्षु समोर उभे रहातात. त्या नांवाचा दरारा परप्रांतीं तर आहेच पण त्या नांवाच्या केवळ उच्चारावर यूरोप मधील गत महायुद्ध जिंकिलें गेलें असें ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्या शब्दास इतकें महत्व झालें आहे कीं त्या शब्दाची जोराची ओढाताण होऊन त्या नांवानें संबोधिली जाणारी एकादी " जात " अगर एखादा " समाज " आहे किंवा नाहीं याबद्दल परदेशी व परप्रांतींही शंकाच आहे. महाराष्ट्रांतील प्रत्येकजण मग तो कोणत्याही जातीचा असो तो परदेशीं " मराठा " असें ह्मणऊन घेण्यांत भूषणच मानतो. परंतु तो महाराष्ट्रांत किंबहुना बॅलर्ड पियरवर उतरतांच आपली जातच काय पण पोटजातही सांगणेंत दूषण मानीत नाहीं. सांगण्याचा हेतु एवढाच कीं " मराठा " या शब्दाला महत्व असून त्या शब्दांत मोहक जादू भरलेली आहे. महाराष्ट्रांत राहाणारा मराठा हें विधान महाराष्ट्रांत तरी कोणी मान्य करणार नाहीं. अशा परिस्थितीत त्या शब्दाचा अर्थ जरी व्यापक असला तरी त्या शब्दाचा जातिवाचक असा अर्थ घेऊन त्या नांवानें संबोधल्या जाणाऱ्या समाजाचा प्राचीन इतिहास लिहिण्यास हल्लींच्या " राष्ट्रैक्य भावने " च्या कालांतही दूषण देतां येणार नाहीं. किंबहुना तसें दूषण दिल्यास चुकीचें होईल. व्यापक अर्थानें तो शब्द वापरणें हें जरी इतर बाबतींत सोईचें व योग्य असलें तरी व्यावहारिक

दृष्टया व महाराष्ट्रियांच्या दृष्टया त्या शद्बाचा जातिवाचक अर्थ घेऊन इतिहास लिहिल्यास अयोग्य होणार नाहीं. कारण महाराष्ट्रांत तो समाज बहुसंख्यांक असून त्याच्या पाठीमागें उज्वल इतिहासही आहे. व त्या समाजाचा इतिहास ह्मणजे पर्यायानें महाराष्ट्राचा महाइतिहासच आहे. असो.

मराठ्यांचा प्राचीन इतिहास आज फारसा उपलब्ध नाहीं. याचीं कारणें अनेक असलीं तरी मुख्य कारण असें दिसतें कीं, इतिहास ह्मणजे राजकीय घडामोड अशी कोती समजूत असल्यामुळें अर्वाचीन कालाचा जो थोडाबहुत इतिहास उपलब्ध आहे तो राजकीय घडामोडींचाच आहे असें दिसून येईल. त्यामुळें प्राचीन समाजस्थिति 'रीतिरिवाज' भाषा यांचा या इतिहासावरून फारसा बोध होत नाहीं. अशा स्थितींत वेद, पुराणें, शिलालेख, परकीय प्रवाशांचीं टिपणें, जुनीं नाणीं, व उपलब्ध असलेलें प्राचीन ग्रंथ यावरून जी माहिति मिळण्याजोगी आहे तिच्यावरच समाधान मानणें भाग आहे. याशिवाय हल्लींच्या लोकांची शारीरिक ठेवण, त्यांची भाषा व सामाजिक रीतिरिवाज ही प्राचीन लोकांच्या शारीरिक ठेवणीचें भाषेचें व रीतिरिवाजाचें प्रतिबिंबच असल्यामुळें त्यांच्यावरून देखील बरीच अनुमानें काढतां येतात.

हीं अनुमानें व वर नमूद केलेलें आधार जमेस धरून श्री. भास्करराव जाधव यांनीं मुंबईच्या मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या बत्तीसाव्या वार्षिक संमेलनाच्या वेळीं अध्यक्ष नात्यानें "मराठे व त्यांची भाषा" या विषयावर जो निबंध वाचला

तोच आज पुस्तक रूपानें प्रसिद्ध होत आहे गेलीं कित्येक वर्षे श्री. जाधवराव यांनीं या विषयांचे वाचन, मनन आणि निदिध्यास केलेला असल्यामुळें त्यांच्या ह्या पुस्तकानें मराठ्यांच्या प्राचीन इतिहासांतील उणीव कांहीं अशी भरून निघाली यांत शंका नाहीं. मराठ्यांच्या आर्यत्वा--क्षत्रियत्वाबद्दल कांहीं सूज्ञ लोकांकडूनही जे आक्षेप घेतले जात होते त्यांचे या पुस्तकांत पुराव्यानिशीं खंडन करण्यांत आलें आहे. तसेंच गोत्र—प्रवरांचा जो हल्लीं घोंटाळा माजला आहे त्याचेंही या पुस्तकाच्या वाचनानें खात्रीनें निराकरण होईल असा आह्मास भरवंसा वाटतो.

महाराष्ट्र ह्मणजे मराठ्यांचा देश. पण महाराष्ट्र ह्मणून ज्या विशिष्ठ प्रांताकडे आपण अंगुली निर्देश करितों तो प्रांत प्राचीन कालीं त्या नांवानें ओळखला जात नव्हता. मराठे--आर्य उत्तरेकडून दक्षिणेकडे आक्रमण करीत असतां त्यांनीं ज्या ज्या भागांत वसाहत केली त्या त्या भागास महाराष्ट्र ह्मणत असत. महाराष्ट्राचा प्रथम उल्लेख बौद्ध कालीन व "महावंश" ग्रंथांत सांपडतो. पण त्यावेळीं अवंतीच्या प्रदेशास महाराष्ट्र—महारट्ट ह्मणत असत असें श्री. जाधव यांचे ह्मणणें आहे. दक्षिणप्रांतीं मराठ्यांची वस्ती कायम झाली तेव्हांच आजचा महाराष्ट्र स्थिर झाला. महाराष्ट्रांतील मराठे हे अनार्य असावेत असा कित्येकांचा समज आहे. पण तो कसा चुकीचा आहे हें श्रीयुत वैद्य यांनीं आपल्या "मध्य युगीन भारत" या पुस्तकांत सप्रमाण सिद्ध केलें आहे व तेंच मत श्री. जाधव यांनीं ग्राह्य मानलें आहे. मराठे शेतकरी असल्यामुळें ते शूद्र

आहेत असा आक्षेप घेतला जातो त्यास पौराणिक व ऐतिहासिक आधार देऊन नांगर धरल्यानें क्षत्रियत्वाला हानि नाहीं, असें श्री. जाधवराव यांनीं सिद्ध करून दाखविलेले आहे. भारतांत ज्या आर्यांच्या टोळ्या आल्या त्या सर्वच " मरहट्ट " होत्या. पुढें त्यांच्यांत वर्ण व्यवस्था सुरू करण्यांत आल्यावर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे भेद पडले पण द्रविड लोक याच मराठ्यांनाच आर्य ह्मणून संबोधीत शिवाय कानडी भाषेंत मराठ्यांना " आर्यरु " ह्मणण्याची वहिवाट आहे. हा शब्द मराठ्यांच्या आर्यत्वाचा निदर्शक आहे. आर्य लोक हे फिरते असल्यामुळें ते दक्षिणेंत स्थीर झाल्यावर साहजिकच मिश्रविवाह सुरू झाले. अर्थात् एकमेकांच्या चालीरीति एकमेकांनीं नकळत उचलल्या व त्या आज तागायत चालू आहेत. देवकांची चाल द्रविडांच्या मुळीं बरोबर आली, मंगळसूत्र हें देखील त्यांचेंच असें श्री. जाधव यांचें मत आहे. यामताच्या समर्थनार्थ " उदेपुरास देवक नाहीं व मंगळसूत्रही नाहीं " असा आधार ते दाखवितात. मिश्रविवाह झाले नाहींत असे जरी मानले तरी एकमेकांच्या निकट सहवासानें वरील गोष्टी घडतात याचे उदाहरण ह्मणजे पाश्चिमात्य राष्ट्राचें हिंदी लोक करीत असलेले अनुकरण हें होय! देवस्कीची चाल जैनापासून आली. कपाळावर कुंकू लावण्याची चाल आर्यांत नव्हती. ती द्रविडांची चाल. याशिवाय इतर बऱ्याच चाली द्रविडांच्या मराठ्यांनीं उचलल्या व मराठ्यांच्याही पदर घेण्यासारखा इतर चाली द्रविडांनीं स्वीकारिल्या. मिश्रविवाह रूढ होते असें ह्मटल्यास त्यावे-

ळेच्या प्रत्येक समाजांत ते रूढ असले पाहिजेत. अमूक एका समाजांत रूढ होते, इतरांत नव्हते असें मानतां येणार नाहीं व तसा आधारही नाहीं.

श्री. भास्करराव जाधव यांनीं या पुस्तकांत " गोत्र प्रवरां " संबंधीं बराच विचार केला आहे. " ब्राह्मण व क्षत्रिय " यांची गोत्रे व प्रवर हीं एकच असल्यामुळें गोत्र ऋषी पासूनच क्षत्रियांची उत्पत्ति आहे " हे श्री. वैद्यांचें मत त्यांनीं अग्राह्य ठरविलें असून गोत्राचा पुरावा डळमळीत व संशयास्पद असल्यामुळें त्यावर जास्त जोर देण्याची त्यांना आवश्यकता भासत नाहीं. हिंदू लोकांत सगोत्र विवाह कर-णेची वहिवाट नाहीं पण गोत्राची अडचण अप्रयोजक आहे, ती बाजूला ढकलीच पाहिजे असें श्री. जाधव यांचें मत आहे.

मराठ्यांच्या देवासंबंधीं व कुलस्वामी संबंधीं प्रस्तुत पुस्तकांत बरीच मनोरंजक व उद्बोधक माहिती असून वाच-नीय आहे.

मराठ्यांची जी भाषा ती मराठी. ही भाषा अत्यंत जुनी असून तिच्या जननीचा मान संस्कृत भाषेकडे जात नाहीं वगैरे गोष्टी सप्रमाण सिद्ध करून दाखविण्यांत आल्या आहेत. वंग भाषेप्रमाणें मराठी भाषा देखील परावलंबी बनू पहात असून त्या-भाषेची स्थिति अत्यंत अनुकंपनीय झाली आहे व या प्रकारास वेळीच आळा बसणें किती आवश्यक आहे व तिचा जिवंत-पणा कायम राखणे कसें जरूरीचें आहे याबद्दल श्री. जाधव यांनीं मराठी भाषाभिमान्यास अत्यंत महत्वाचा इषारा दिला

आहे. त्याचें अनुकरण साहित्यसंमेलनासारख्या संस्थांनी जोरानें करावा अशी आमची नम्र सूचना आहे.

मराठा जातीला " राष्ट्रीय जात " ह्मणून प्रस्तुत पुस्तककर्ते संबोधतात. कारण ती जात सर्व संग्राह्य आहे. या पुढें लहान लहान जाती टिकणें कठीण असल्यामुळें सर्वांनीं या राष्ट्रीय जात गंगेत मिळून पावन व्हावें असें सांगून त्यांनीं या छोट्या पुस्तकाचा शेवट केला आहे.

श्री. जाधव यांनीं जमेस धरलेली सर्वच अनुमानें किंवा केलेलीं विधानें सर्वांना ग्राह्य होतील असें नाहीं. मत-भेद हा असणारच. पण त्यांनीं केलेले हे परिश्रम मराठ्यांच्या प्राचीन इतिहासाला जोराची चालना देण्यास उपयोगी पड-तील हें खास. शेवटीं श्री. जाधव यांनीं हें महत्वाचें पुस्तक लिहिण्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून व त्यांच्या हातून अशीच वाङ्मय सेवा घडेल अशी इच्छा प्रदर्शित करून ही प्रस्तावना पुरी करतो.

ता० २९–७–३२ }
शाहूपुरी. } शा. सं. भोंसले.

६५३८
स्थल ना
क्र. ६ - ७५८
ता. २१।५।३३

## मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वत्तिसाव्या वार्षिक समारंभाच्या वेळी रा. रा. भास्करराव जाधव यानी अध्यक्ष या नात्याने केलेले भाषण.

७८९

# मराठे व त्यांची भाषा.

" मराठे लोक व त्यांची भाषा " या विषयावर आपणापुढे चार शब्द सांगण्याचे धाष्टर्य करण्याचे मी योजिले आहे. वाचन, मनन आणि निदिध्यास या साधनांनी समजून आलेल्या गोष्टी ग्रंथरूपाने विद्वानांपुढे मांडण्याचे काम करण्यास मला आजपर्यंत सवड झाली नाही. मासिकांतून लेख प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न एक वेळच झाला. माझ्या विचारांची प्रसिद्धी आजच्या प्रसंगाने करण्याची संधी आपल्या कृपेने मला लाधली हा आपला मजवर मोठा उपकारच झालेला आहे.

## मराठा जातिवाचक शब्द.

येथे मराठा या शब्दाचा मी संकुचित अर्थ घेणार आहे. ह्मणजे मराठा या नावाने महाराष्ट्रात ओळखली जाणारी जी जात आहे तिच्याविषयीच विशेषेकरून मी सांगणार आहे. जातिभेद नष्ट झाले पाहिजेत; आपण सर्व एकाच हिंदी राष्ट्राचे घटक आहोत; ही तत्वे मला मान्य आहेत व ही तत्वे विचारात व आचारात आणण्याचे कार्य जरूर झाले पाहिजे अशी माझी भावना आहे. या भावनेवर नजर ठेवूनच मी आजचा विषय पसंत केला आहे व मराठा शब्दाचा अर्थ

संकुचित करीत आहे. मराठा ही जात इतर जातीपेक्षा बऱ्याच बाबतीत भिन्न आहे. हिच्या अंगी संग्राहक शक्ती आजच्या काळीही बऱ्याच मोठ्या प्रमाणात जागी आहे. राष्ट्रीय द्रिष्टी या जातीच्या अंगी मुरलेली आहे. हा या जातीचा विशेष गुण कसा उत्पन्न झाला व कसा वाढीस लागला याचा इतिहास मोठा उद्बोधक आहे. या भाषणांत मराठा जातीसंबंधी जे विचार येतील ते सर्वांसच मान्य होतील असे नाही. जे विचार अमान्य असतील ते त्या जातीच्या माणसानेच मांडणे बरे. इतराने मांडल्यास वादाचा मुद्दा बाजूस राहून जाति-द्वेषाचा आरोप जोराजोराने करण्यात येतो व त्याचा परिणाम वाईट होतो. ज्याच्या जात्यभिमानास धक्का बसला असेल तो बहुधा हे अप्रिय विचार मांडणाराच्या शुद्ध बुद्धीविषयी शंका घेतो. हे सर्व दुष्परिणाम शक्य तितके टाळावयाचे असल्यास हे काम त्या त्या जातीतील माणसाने सत्यान्वेषणाच्या ध्येयावर नजर ठेवून करावे हे बरे.

महाराष्ट्रात राहाणारा तो मराठा, असे कधी कधी सांगण्यात येते; पण हे विधान महाराष्ट्रात कोणी मान्य करीत नाही. कारण लोकसंख्येच्या जवळ जवळ निम्मे अशी एक मोठी जात मराठा याच नावाने ओळखली जाते व तिच्याबाहेरील लोकांस निरनिराळी जातिवाचक नावेही आहेत. आता महाराष्ट्राबाहेरील प्रांतात व परदेशात महाराष्ट्रातील सर्व लोकांस मराठे या नावानेच ओळखतात, हे आधुनिक समजुतीस अनुसरूनच आहे.

## लोकावरून देशास नावे मिळतात.

फ्रान्स, जर्मनी, रशिया वगैरे देशात राहणाऱ्यास त्या त्या देशाच्या नावावरून फ्रेंच, जर्मन, रशियन असे ह्मणतात. पण वास्तविक पाहतां लोकांच्या नावावरूनच देशास नावे मिळाली आहेत. फ्रांक लोक ज्या देशात जाऊन राहिले त्या देशास फ्रान्स असे नाव मिळाले, जर्मन राहिले त्यास जर्मनी ह्मणू लागले व रशियन लोकानी वसणूक केली ह्मणून त्या देशास रशिया या नावाने ओळखू लागले; अशी पूर्वीची परंपरा आहे. या देशात येऊन वर्चस्व गाजविणारे लोक महाराष्ट्र किंवा मरहट या नवाने प्रसिद्ध असल्याने या लोकानी जेथे जेथे वसणूक केली त्या प्रदेशाला ते नाव मिळाले. महाराष्ट्र हे त्या नावाचे संस्कृत भाषेचे रूप ग्रंथातून वगैरे प्रसिद्ध झाल्याने आता मराठ्यानी शेवटी वस्ती कायम केलेल्या देशास ते नाव मिळाले आहे.

कै० राजारामशास्त्री भागवत यांचा "प्राकृत भाषेची विचिकित्सा" नामक निबंध प्रसिद्ध आहे त्यांत ते ह्मणतातः--

" महाराष्ट्र ह्मणजे 'मोठें राष्ट्र' ही व्युत्पत्ति चांगलीशी नाही. तेलंगण हेंही 'राष्ट्र' मोठें आहे, गौड हेंही 'मोठें राष्ट्र' आहे. तशांत 'अल्प राष्ट्र' असतें तर त्याच्याहून 'मोठें राष्ट्र' ह्मणण्यास सवड होती; पण 'अल्पराष्ट्र' नाहीं. जो शब्द संस्कृतांत महाराष्ट्र लिहितात, तो प्राकृतात मरहट्ट लिहिला जातो. रेड्डि नांवाची एक तेलंगी जात अजूनही आहे. रट्ट कुळींतले राजे कुंतल देशावर राज्य

करीत असून, त्यांची राजधानी बेळगांव ( वेळुग्राम, वेणुग्राम ) होती. रेड्डि व रट्ट हे शब्द मूळचे सजात दिसतात. जसे रेड्डि व रट्ट होते तसे महरेड्डि किंवा महरट्ट असेही लोक पूर्वी असावे. रेड्डि व रट्ट ज्यांतून निघाले किंवा निराळे पडले, ते महरेड्डि किंवा महरट्ट समजल्यास, ‘ मह ’ या अवयवाचा ‘ महत् ’ शीं मेळ पडेल. रेड्डि व रट्ट हे ज्याप्रमाणें स्वतंत्र होते, त्याप्रमाणें महरेड्डि किंवा महरट्ट हेही होते, अशाही दृष्टीनें या शब्दाकडे पहातां येईल........गुजराथी व हिंदुस्थानी लोक ‘ मरेठो ’ किंवा ‘ मरेठा ’ असें रूप देतात तें महरेट्टि नांवावरून देत आले असावें. पुढें टकारात प्राण जास्त घुसवून मराठा किंवा मराठी असा उच्चार करण्याचा व लिहिण्याचाही संप्रदाय पडला. ‘ नुकसान–नुसकान ’ प्रमाणें व्यंजनांचा विपर्यास होऊन महरट्ट शब्दापासून ‘ मरहट्ट ’ शब्द निघालेला दिसतो. याप्रमाणें या मूळच्या निव्वळ देशी शब्दास महाराष्ट्र असें मोठें रूप देऊन संस्कृत भाषेनें आपल्या शब्दाच्या भांडारात ओढून घेतलें. शालिवानाचा वंश व पैठण नगर यांच्याप्रमाणें महाराष्ट्र शब्द कमींत कमी बावीस साडे बावीसशें वर्षांचा आज झालेला असून, या त्रिवर्गाची मगरमिठी पडली आहे, ती सोडवितां येत नाहीं”

## महाराष्ट्राचा प्रथम उल्लेख.

महराटे किंवा मरहट्ट या लोकांवरून देशास महराटा असे नाव पडले व त्याचे संस्कृतरूप महाराष्ट्र असे झाले, हा तर्क केवळ यूरोप खंडातील देशांच्या नावावरून काढलेला

नाही. महराट शब्दाचा इतिहासच हा तर्क खरा ठरवितो.

हा देश कोठे होता व हे नाव केव्हापासून प्रचारात येऊ लागले याचा शोध करिताना पाचवा वेद जे महाभारत त्यांतील देशांच्या नावांच्या यादीकडे प्रथम लक्ष जाते. सदर यादींत निरनिराळया देशांची किंवा त्यांच्या अधिपांची नावे भिन्न भिन्न प्रसंगाने आली आहेत. पण त्या नावात महाराष्ट्र हे नाव नाही. त्यापूर्वीच्या कोणत्याही ग्रंथात हे नाव आढळत नाही. त्यानंतरच्या काळात बौद्धाच्या महावंश या ग्रंथात हे नाव प्रथमच आढळते. मोगलीपुत्र नामक मुनीने महरट्ट, अपरान्तक व वनवासी या तीन देशात स्वधर्मप्रचारक पाठविले होते असे यात आहे. त्या वेळी अवन्तीच्या आसपासच्या प्रदेशास महारट्ट ह्मणत. ख्रिस्ती सनाच्या दुसऱ्या शतकाच्या एका शिलालेखात महारटी व महारटिनी अशी नावे उत्सर्गकर्त्यांची ह्मणून आली आहेत. उज्जनीजवळील प्रांतास महाराष्ट्र नाव मिळण्यास तेथे त्यांची वस्ती दीर्घकाल झाली पाहिजे.

दुसऱ्या कोणी बलाढ्य राष्ट्राने महारट्टांस उज्जनी प्रांत सोडण्यास लावल्याने ते दक्षिण दिशेस सरकले असावे. त्याच वेळी उज्जनी प्रांताचे महारट्ट हे नांव गेले व त्याचे नवीन नाव त्यास मिळाले असले पाहिजे. महारट्टे हे विदर्भ व्यापून राहिले.

## मराठे विदर्भात घुसतात.

या प्रांती त्यांची सत्ता पसरल्याने त्या प्रांतास महरट्ट ह्मणू लागले. विदर्भ देशास हे नांव पडल्याची साक्ष बालरामायण

व अनर्घराघव यावरून पटते. " इदमग्रे महाराष्ट्रमंडलैकमंडनं कुंडिनं नाम नगरम् " असे अनर्घराघवांत ह्मटले आहे. यावरून सरळ अनुमान काढल्यास कुंडिनपुर ही महाराष्ट्र मंडळाची राजधानी होती, ह्मणजे ते शहर त्या वेळीं महाराष्ट्राचे केंद्र होते.

## तेथून पुढे

पण तेवढ्याच प्रांतांत मराठे राहिले नाहीत. विदर्भ न सोडता ते दक्षिणेस पसरत चालले व अशा रीतीनें महाराष्ट्र देशाची व्याप्ति मोठी होऊ लागली. अर्थातच कुंडिनपूर हा मध्य खाली खाली येऊन पैठण येथे स्थिर झाला. हुअेनत्संगाच्या वेळी महाराष्ट्राचा घेर हजार मैल होता. उत्तरेस माळवा, पूर्वेस कोसल आणि आंध्र, दक्षिणेस कोंकण व पश्चिमेस समुद्र या त्याच्या मर्यादा होत्या. त्याची राजधानी भडोचच्या पूर्वेस १६७ मैलावर होती. ही बहुशा पैठण असावी.

मार्कंडेय, वायु व मत्स्य या पुराणांत एका आंगास अपरांत ह्मणजे उत्तर कोंकण व दुसऱ्या अंगास नर्मदा व तापी या दोन्ही नद्यांचे दोन्ही थडींचे प्रदेश व विदर्भदेश यांपासून पृथक्त्वाने महाराष्ट्राचा निर्देश केला आहे. रत्नकोश ग्रंथात जवळ जवळ असाच निर्देश आहे.

यावरून पहाता मरहट्ट किंवा महरट्ट हे देशाचे नांव पूर्वी नव्हते. ज्या ज्या प्रदेशी या नांवाचे लोक वसाहत करून राहिले त्या त्या प्रदेशास त्या त्या काळी ते नांव मिळे. ते लोक तो प्रदेश सोडून गेले ह्मणजे तेथे येऊन राहणाऱ्यांचे

नाव त्या प्रदेशास मिळे व महरट्टाबरोबर त्यांचे नांवही नवीन वसाहतीस मिळे. ह्मणजे मराठ्यांचे शासन ज्या प्रदेशावर ज्या काळी असेल त्या काळी त्या प्रदेशास महाराष्ट्र म्हणत. असा क्रम मराठे आजच्या महाराष्ट्रांत स्थिर होईपर्यंत चालला.

## आता देशावरून लोक ओळखले जातात.

आता लोकांवरून देशास नाव पडण्याचे दिवस गेले. निरनिराळ्या राष्ट्रास स्थायिकपणा आला. यामुळे प्रदेशाची नावे कायम झाली व पुढे जो कोणी त्या देशांत राहात असेल त्यास त्या देशाचे नाव मिळू लागले. महरट्टयावरून आजच्या महाराष्ट्र देशास ते नाव प्रथम मिळाले असले तरी आता 'महाराष्ट्रांत राहाणारा तो मराठा' असे महाराष्ट्राबाहेर तरी हमखास सर्व म्हणतात. महाराष्ट्रात मराठा ही जात स्वतंत्र राहिल्याने मराठेतर जातीच्या माणसास त्याच्या विशिष्ट जातीच्या नावाने ओळखले जाते. हा महाराष्ट्राचा विशेष आहे. गुजरातेत गुजर या नावाची विशिष्ट अशी जात नाही. यामुळे गुजरातेबाहेर व तेथेही लोकास स्थूलमानाने गुजर किंवा गुजराती म्हणतात. अशीच गोष्ट बंगाल, तेलंगण, माळवा वगैरे बहुतेक प्रांतांची आहे.

महावंश ग्रंथावरून आपणास महरट्टयांचा पत्ता प्रथम उज्जनी प्रांती लागला. नंतर ते खाली सरकत सरकत आजच्या महाराष्ट्रास कसे व्यापून राहिले याचा पुरावा आपण पाहिला. त्या वेळी कोंकण पृथकच होते; पण हळू हळू कोंकणही मराठ्यांच्या नियंत्रणात आले; पण मराठे हे काही उज्जनी

प्रांताच्या जमिनींत उगवलेले नाहीत. ते तेथे दुसऱ्या ठिकाणाहून आलेले आहेत. ते कोठून कसे आले याचा शोध केला पाहिजे.

## मराठ्यांचे पुराण भटकणे.

महावंशापूर्वीच्या ग्रंथात महरट्ट किंवा मरहट्ट यांच्या-संबंधी दाखला लागत नाही. याप्रमाणे पहिल्या प्रतीच्या पुराव्याच्या अभावी दुय्यम पुराव्यावरून अनुमाने बांधावी लागतात. हिंदुस्थानातील लोकात इतिहास लिहून ठेवण्याची प्रवृत्ती फार कमी. यामुळे पहिल्या प्रतीचा पुरावा बहुधा मिळत नाही. अशा वेळी अनुमानाला आधारभूत गोष्टी तीन प्रकारच्या मिळण्या-सारख्या असतात:- (१) माणसाच्या शरीराची ठेवण, (२) भाषेची रचना व तिची वाढ, (३) धार्मीक व सामाजीक चालीरीती.

शरीराची ठेवण; यांत विशेषत: डोक्याचा विचार केला जातो. रुंद डोके, चपटे डोके, वाटोळे डोके वगैरेवरून काही अनुमाने काढता येतात. पण हे प्रमाण निस्संशय उपयोगी पडत नाही असा तज्ज्ञांचा निर्णय आहे. यांत नाकाचे माप विशेष महत्वाचे आहे. खानेसुमारीच्या रिपोर्टात व कुलपति चिंतामणराव वैद्य यानी आपल्या ग्रंथात या मापाचा जास्त विचार केला आहे व त्यावरून मान्य करण्यासारखी अशी अनुमाने बांधली आहेत. त्यांची पुनरुक्ति करण्याची जरूर नाही.

## उत्तर ध्रुवापासून.

आर्यांची वस्ती मूळ उत्तर ध्रुवाजवळ होती. तेथून निघावे लागल्यावर आर्यांच्या टोळ्या निरनिराळ्या दिशेस भिन्न

भिन्न काळी गेल्या व तेथे वसाहत करून राहिल्या. त्यांच्या मागून ज्या टोळ्या आल्या त्यांनी पूर्वीच्यास पुढे लोटले किंवा आपणच पुढे गेले. याप्रमाणे आर्यांच्या मुख्य दोन टोळ्या हिंदुस्थानात शिरल्या. त्यातील पहिल्या टोळीस वैद्यांनी सूर्यवंशी ह्मटले आहे. ती खैबर घाटाने येऊन पंजाब व राजपुताना हा प्रदेश व्यापून राहिली. आर्य लोकांची दुसरी ( चंद्रवंशी ) टोळी मध्य एशियांतून गिलजीत व चित्रल मार्गाने हिंदुस्थानांत शिरली. तिने प्रथमतः गंगा व यमुना यामधील दोआबात ह्मणजे स्मृतिकालीन ब्रह्मावर्तात वस्ती केली व पुढे हळू हळू दक्षिणेकडे ती पसरत गेली. भाषाशास्त्र व नाकाची मापे या दोन प्रमाणावरून या दोन टोळ्यांचे प्रवेश निश्चित करण्यात आले आहेत. पुढे यातील मरहट्ट हे नाव असलेली टोळी उज्जनी प्रांती स्थिर झाली. आणि वर वर्णिल्याप्रमाणे दक्षिणेकडे पसरली.

काही यूरोपीय ग्रंथकार व त्यास अनुसरणारे थोडेसे हिंदी विद्वान् जाट, गुजर व मराठे यांचा संबंध अनार्यांशी जोडू पाहातात. त्यातून मराठे हे शक अथवा स्किथियन यांचे वंशज आहेत यावर त्यांचा जोर आहे. पण हे समज कसे चुकीचे आहेत व जाट, गुजर व मराठे हे कसे आर्य-वंशीय क्षत्रिय आहेत हे चिंतामणराव वैद्यांनी आपल्या मध्य-युगीन भारत ग्रंथातील एका स्वतंत्र प्रकरणात सिद्ध केले आहे. यासाठीं या बाबतीत जास्त ऊहापोह करण्याची जरूरी नाही.

## शकपह्लव आर्यच.

रा० रा० विठ्ठलराव शिंदे हे मोठे शोधक इतिहासज्ञ आहेत. यांच्या मते शकपह्लव वगैरे हिंदुस्थानात आले व ते येथील समजात मिसळून गेले. हे परदेशी लोकही मूळच्या आर्यवंशाचेच होते असे ते प्रतिपादन करतात.

नागकुल किंवा सर्पकुल हे आर्यवंशी किंवा द्रविडवंशी असा एक वादाचा प्रश्न आहे. नाग या नावाने सध्या ओळखले जाणारे लोक द्रविडवंशी निःसंशय आहेत. पण पूर्वीचे नाग किंवा सर्प हे सर्व अनार्यच होते असे म्हणणे धाडसाचे आहे. तक्षक हा नागापैकी होता व त्याच्या नावाचे दोन तुकडे पाडून ( तक्+शक ) तो शकांतील होता असे जें प्रतिपादन रा. रा. विठ्ठलराव यानी केले आहे ते विचार करण्यासारखे आहे.

## मराठे क्षत्रिय शेतकरी.

मराठे हे शेतकी करणारे आहेत यावरून ते शूद्र तरी असावेत किंवा वैश्य तरी असावेत, पण ते क्षत्रिय नाहीत असे काहींचे ह्मणणे येते. त्याचा थोडा परामर्ष घेतला पाहिजे.

मराठ्यांचे मुख्य धंदे शेतकी व शिपाईगिरी हे आहेत. त्याच पेशाचे रजपूत, जाट व गुजर हेही आहेत. त्यांतील रजपुतांचे क्षत्रियत्व सर्वमान्य आहे ह्मणून कोणी त्याविषयी शंका घेत नाहीत. जाट, गुजर व मराठे यांविषयीच प्रश्न काढण्यात येतो. मनुस्मृति, भगवद्गीता वगैरे ग्रंथात कृषि, गोरक्ष्य आणि वाणिज्य हे धंदे वैश्याचे सांगितले आहेत.

६८३८
सं. १ ता. २१.११.३३

वैखानससूत्रे इत्यादि आधुनिक ग्रंथांनी यापलीकडे मजल मारून गोरक्ष्य व वाणिज्य हे दोनच धंदे वैश्याकडे ठेवून कृषि ही शूद्राकडे देऊन टाकली. मनु प्रमाण मानणारे लोक जाट, गुजर व मराठे हे कृषि करणारे अतएव वैश्य आहेत असे ह्मणतात. ह्मणजे त्यांच्या क्षत्रियत्वावर आक्षेप घेतात. काहींची मजल त्याना शूद्र मानण्यापर्यंत गेली आहे.

## वर्णांची उत्क्रांती.

मनुष्याची उत्पत्ति झाल्यापासून चार वर्ण अस्तित्वांत आहेत असे ह्मणण्यास आधार नाही. पूर्वी एकच वर्ण होता असे महाभारत, भागवत वगैरे ग्रंथात स्पष्ट सांगितले आहे. मनुष्ये प्रथम व्याधवृत्तीने ह्मणजे शिकारीवर व वन्य फळावर उपजीविका करीत होती. त्या वेळी सर्वच क्षात्रवृत्तीचे होते. त्यापुढील पायरी गोपालवृत्तीची. हीत गोधन हरणाराशी लढण्याचा प्रसंग वारंवार येत असल्याने क्षात्रवृत्ति कायम राहून वैश्य वृत्तिही स्वीकारावी लागली. यापुढील समाजाची पायरी शेतकी करून गावे वसाविणे. या वेळी बराच मोठा समाज शेती करणारा, काही लोक पशुसंवर्धन करणारे असे वैश्य वृत्तीचे राहून वेळ पडल्यास शत्रूशी झुंजण्यास सर्व समाज तयार असल्याने क्षात्रवृत्ती कायमच होती. अशा रीतीने विशवृत्ती व क्षात्रवृत्ती एकत्र असे. विशवृत्ती ही नेहमीची पोट भरण्याची. क्षात्रवृत्तीचा अवलंब शत्रूशी लढण्याच्या प्रसंगी.

## सर्वच विश्.

चातुर्वर्ण्य संस्था कशी उदयास आली हे पाहणेही उपयुक्त आहे. ओकांच्या गीर्वाण लघुकोशात विश् या पुल्लिंगी

शब्दाचे चार अर्थ दिले आहेत. १ वैश्य; २ मनुष्य; ३ लोक, प्रजा; ४ राजा. यातील पहिला अर्थ आजचा चालू अर्थ आहे. दुसरा मनुष्य हा अर्थच या शब्दाचा मूळचा अर्थ आहे. ज्या वेळी वर्णव्यवस्था नव्हती, सर्व एकाच वर्णाचे होते तेव्हा सर्वच विश् होते. समाजास शास्ता पाहिजे अशी गरज भासली तेव्हा त्या शास्त्यास 'विशांपतिः' ह्मणूं लागले. हा सर्व विशांचा प्रतिनिधि ह्मणून विश् ह्मणजे राजा असा चौथा अर्थ निघाला. राजाच्या नात्याने विश् हे प्रजाजन झाले म्हणून विश् शब्दाचा तिसरा अर्थ निघाला. कृषि व गोरक्ष्य या धद्यात सर्वच असत, राजाचीही मोठमोठी खिल्लारे होतीच व राजेही नांगर धरीत. यामुळें मनुष्य या अर्थाने सर्वांसच विश् म्हणत आले आहेत. हे सर्व लोक प्रसंग पडेल तेव्हा हातात हत्यार घेऊन लढण्यास तयारच असत. राजा ही संस्था सुरू झाल्यावर प्रधान, सेनापति, इतर नोकर यांची जरूर भासू लागली. यांचा सारा वेळ याच कामी जाऊ लागल्याने शेती किंवा जनावरे बाळगणे या कामास अवकाश मिळेना. अशा रीतीने शेती न करणारा व पुढे शेती करणे हे हलके काम आहे असे मानणारा वर्ण उत्पन्न झाला. त्यास राजन्य किंवा क्षत्रिय म्हणू लागले, व लढण्याचे काम त्याच्याकडे सोपविले. अशा प्रकारे क्षत्रियवर्ण विशातूनच निघाला आहे. पुढे ब्राम्हण हा वर्ण क्षत्रियातून बाहेर पडला. याप्रमाणे प्रथमता ब्राम्हण व क्षत्रिय एकच होते. क्षत्रिय हे ब्राम्हणाचे काम करीत; ब्राम्हण क्षत्रियाचे काम करीत, क्षत्रिय ब्राम्हण होत व ब्राह्मण क्षत्रिय होत. एकाचीच मुले आपल्या इच्छेप्रमाणे काही क्षत्रिय होत, काही ब्राह्मण होत, असा

प्रकार असे. याच कारणाने ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांत परस्पर शरीरसंबंध होत असे. वर्णास जसजसे जातीचे रूप येऊ लागले तसतसे हे संबंध कमी होऊ लागले व जातीच्या बाहेरच्या स्त्रीशी किंवा पुरुषाशी प्रथमता प्रतिलोम व नंतर अनुलोम असे विवाहसंबंध बंद पडले. अशा रीतीने चार वर्ण अस्तित्वात आले. सुरवातीस सर्वच आर्य द्विज ह्मणजे विश् होते. विशांतून क्षत्रिय निघाले, ह्मणून तेही द्विजच. क्षत्रियांतून ब्राह्मण निघाले तेही द्विजच. तीनही वर्णाला द्विज ह्मणतात त्याचे कारण हे आहे.

हर्षवर्धन राजा वैश्यवर्णी होता असे ह्यूएन्त्संग ह्मणतो. त्याचे घराणे नुकतेच थोड्याच पिढ्यापूर्वी शेतकऱ्यातून वर आले असावे. व्यापाऱ्यातून वर येणे व राज्य कमावणे शक्य दिसत नाहीं. पूर्वीचे सर्विया ह्मणजे आजचे यूगोस्लाविया याचा पहिला राजा असाच शेतकी घराण्यांतून बाहेर पडला. आमची मराठी राजघराणी याच धंद्यातील आहेत.

## शूद्र वर्ण.

अनार्यांना जिंकून दास केल्यावर त्यांचा चवथा शूद्रवर्ण बनविला व त्यांच्याकडे तिन्ही वर्णाची सेवा हे काम सोपविले. कालांतराने ब्राम्हण हे क्षत्रियास व वैश्यास, क्षत्रिय हे वैश्यास, व तीनही वर्ण शूद्रास हलके मानू लागले. शेती करणे हे मोठ्या कष्टाचे काम, ब्राम्हण क्षत्रियास ते करण्याची सवड नाही म्हणून ते शूद्राकडे दिले गेले. विश् आपली शेती करीत त्याच्याकडेही शूद्र म्हणून हलकेपणा येऊ लागला. याचा परिणाम एकंदर समाजहिताच्या दृष्टीने फार वाईट झाला. क्षत्रि-

यानीच तेवढे लढण्याचे काम करावे. इतराचे ते कर्तव्य नव्हे असे मानण्यांत येऊ लागल्याने लढणाऱ्यांची संख्या थोडी पडली व परक्या शत्रुबरोबर लढताना ते सहज पराभूत झाले, व देश पारतंत्र्याच्या गर्तेत पडला.

## शेतकरी शिपाई.

पण जाट, गुजर व मराठे यानी मात्र शेती व शिपाईगिरी हे दोन्ही पेशे एकत्र चालविले. या कारणाने त्यांच्या फौजेत लढाऊ लोकांची तूट पडली नाही व प्रसंगविशेषी यानी आपले क्षात्रतेज चांगलेच दाखविले. पण विशेष चोखंदळ लोक यांचे क्षात्रियत्व बरेच दिवस कबूल करीत नव्हते. क्षात्रियत्व व कृषिकर्म यांची फारखत श्रमविभागाच्या तत्त्वावर झाली असली तरी नांगर धरण्याची परंपरा बऱ्याच राजे लोकानी राखिली आहे. ते नांगर धरतात म्हणून त्यांच्या क्षत्रियत्वास बाध येतो असे कोणीही समजत नाहीत.

## क्षत्रिय आणि नांगर.

रामायणांत बालकांडात वाल्मीकींनी पुढील श्लोक राजा जनकाच्या तोंडी घातला आहे. " अथ मे कृषतः क्षेत्रं लांगलादुत्थिता मया। क्षेत्रं शोधयता लब्धा नाम्ना सीतेति विश्रुता ॥ " चिपळूणकर मंडळीच्या रामायण-भाषांतरांत याचा मराठी अर्थ दिला आहे तो असा- " मी अग्निचयनाकरितां क्षेत्र शुद्ध करण्याच्या हेतूनें जमीन नांगरूं लागलों असतां नांगरांतून एक कन्या मला प्राप्त झाली. " मूळांत अग्निचयनाचा उल्लेख नाही. भाषांतरकाराने तो मुद्दाम केला आहे. कदाचित्

टीकेमध्ये हा उल्लेख असेल. पण हे कारण वादाकरिता खरे मानले तरी काही विशिष्ट कारणासाठी जनकासारख्या थोर क्षत्रियाला स्वता नांगर धरावा लागे हे निश्चित आहे. अगदी अपरिचिताला नांगर धरणे सोपे काम नाही. संवय असेल तरच नांगरटीचे काम होते. यावरून कधी कधी नांगर धरण्याचा अभ्यास जनकास असावा असे अनुमान निघते.

यादवातील प्रमुख जो बलराम तो हलधर होता. नांगर हेच त्याचे हत्यार होते. रजपुत राजांत एका ठरीव दिवशी सर्व दरबारचे लोक बरोबर घेऊन राजाने एक दिवस नांगर धरावा असा संप्रदाय आजही आहे. स्वता नांगर धरून राजाने नांगरणी केल्यावर सर्व राज्यात नांगरणी सुरू होते. चीन देशात बादशहाचे उच्चाटन झाल्यापासून पूर्वीचा आचार बंद असावा ; पण बादशहा सिंहासनावर होता तेव्हा त्याला वर्षातून एक दिवस अशाच समारंभाने नांगर धरून राज्यातल्या नांगरटीस सुरवात करावी लागे. चीनचे व जपानचे दोन्ही बादशहा सूर्यपुत्र म्हणवितात ; म्हणजे ते आपण सूर्यवंशी आहो असे सांगतात. यावरून नांगर धरण्याने क्षत्रियत्वाला हानी नाही असे सार्वत्रिक मत आहे असे सिद्ध होते.

## नांगऱ्या पाटील.

मराठे लोकातील पाटील, देशमुख, देसाई वगैरेच्या घराण्यात यासंबंधाने कशी चाल आहे ते पाहू. गावात मुख्य अधिकारी पाटील. याच पाटलानी गावचे मर्द जमा करून तरवार गाजवून प्रथम सरदाऱ्या व नंतर राज्येही संपादिली

आहेत. शिंदे, होळकर, गायकवाड, पवार, जाधव, कदम वगैरे सर्व पाटीलच होते. खुद्द छत्रपतींच्या घराण्यातही पाटीलकी होतीच व त्यांचे वंशज अजून पाटीलकी चालवीत आहेत. पाटलांच्या घराण्यात भाऊपणा जास्त वाढला म्हणजे वतन-जमिनींच्या वाटण्या होतात. पाटीलकीचे काम करण्याचा हक्कही वाटून दिला जातो. पण वडील घरच्या मुख्यास ओळखण्यासाठी त्यास "नांगऱ्या" पाटील ह्मणतात. बाकीच्यास 'बिरादर' पाटील असे नाव आहे. गावचा सर्व मानपान नांगऱ्या पाटलाचा. बिरादरास त्यात हिस्सा नसतो. बऱ्याच गावात पाटीलकीच्या वतनापैकी काही जमिनीस "नांगराखालची" जमीन ह्मणतात. ती जमीन भाऊबंदात विभागली जात नाही; नांगऱ्या पाटलाकडेच ती राहाते. या जमिनीत नांगऱ्या पाटलानें नांगर धरल्यावरच गांवच्या लोकानी नांगर जुंपावयाचा अशी वहिवाट आहे. पूर्वीच्या महजर वगैरे जुन्या कागदात पाटलांच्या सह्या असतात व त्यांची नावे असतात, त्यात मुख्य पाटलास हमेशा "नांगरे" ह्मटले जाते. नांगरे व बिरादर पाटील याच्या सहीच्या निशाणीत एक ठळक फेर दिसून येतो. मोठा नागर सर्व अंगासह, दोन किंवा चार बैल जुंपलेले, असे चित्र नांगऱ्या पाटील सहीची निशाणी ह्मणून काढीत असे. बिरादर पाटील साधा नांगर निशाणीदाखल काढी. बरेच देशमुख, व देसाई नांगरे पाटलासारखाच नांगर काढीत. यामुळे शेतकीचे ह्मणजे नांगराचे महत्व मराठे लोकांत पूर्वीपासून कायम राहिले. क्षत्रियवर्णाच्या लोकांस त्यात कमीपणा वाटण्याचे काही कारण नाही. मराठे, रजपूत, जाट, गुजर यानी आपली शेती

सोडली नाही. तरवारीबरोबरच नांगराच्या रुमण्यावरही आपला हात कायम ठेविला. शेती व शिपाईगिरी हे दोन्ही धंदे हे लोक करीत आले आहेत.

## द्रविड भाषेत मराठा जातीसच आर्य ह्मणतात.

हळू हळू दक्षिणेकडे सरकत जाऊन स्थिर झालेल्या द्रविडांच्या शेजारी व बरेच ठिकाणी त्यांच्या वस्तीतच मराठे जाऊन राहिले आहेत. त्यांची साक्ष मराठे क्षत्रिय आहेत की नाहीत याविषयी महत्वाची आहे. मराठे दक्षिणेत प्रथम आल्यास १८००–१९०० वर्षे झाली आहेत. इतक्या दीर्घकालपर्यंत मराठ्यांस ते आर्य या शद्बानेच ओळखत आले आहेत. आज महाराष्ट्रात शेकडो जाती आहेत. त्यांपैकी प्रत्येक जातीच्या माणसाचा उल्लेख अमुक जातीचा ह्मणून करतात. पण मराठा जातीच्या माणसास ते आर्य ह्मणतात. त्याचप्रमाणे मराठी भाषेस आर्य भाषा ह्मणतात. कोर्टात मराठी भाषेत जबानी देण्याच्या प्रसंगी हे लोक मला आर्य भाषा समजत नाही असे सांगतात. प्रथमपासूनच मराठे हे आर्य म्हणून द्रविडांस माहीत झाले व तीच परंपरा आजपर्यंत चालू आहे. रा. रा. वैद्य यानी ऐतिहासिक, शारीरीक व नाकाचे माप वगैरे प्रमाणानी जो सिद्धांत काढला आहे त्यास या रीतीने पुष्टि मिळाल्याने मराठ्यांच्या आर्यत्वाविषयी संशय राहात नाही.

## द्रविडांतून बायका घेणे.

सूर्यवंशी टोळीबरोबर त्यांची बायकामुले आली होती ह्मणून पंजाब व राजपुताना यातील आर्य पुष्कळच शुद्ध वंशाचे

राहिले आहेत असे त्यांच्या नाकाच्या प्रमाणावरून दिसून येते. चंद्रवंशी टोळीला बऱ्याच लांबच्या व अडचणीच्या मार्गानें यावें लागलें, यामुळे बायकांचा भरपूर भरणा त्यांच्याबरोबर राहाणे शक्य नव्हते. यासाठी गंगा व यमुना यांच्या आसपासच्या मुलखांत त्यानी कायमची वसाहत द्रविडाशी लढून व त्याना हांकून देऊन केली, तेव्हा बऱ्याच पुरुषाना द्राविडांच्या बायकाशी विवाह करावे लागले. यामुळे आर्य व द्रविड या जातींचे बरेचसे मिश्रण या लोकांत सुरू झाले. श्रीमंत व उच्च घराण्यात हे मिश्रण जास्त झाले नाही ; पण गरीब घराण्यांत ते जास्त प्रमाणावर झाले.

काही जिंकलेले द्रविड शूद्रवर्णात दाखल केले गेले व त्यानी सेवावृत्ति स्वीकारली. बाकीचे हटत हटत दक्षिणेकडे सरकू लागले. आर्यांची संख्या नवीन भरतीमुळे किंवा संख्यावाढीमुळें जसजशी वाढत गेली तसतशा आर्यांच्या टोळ्या द्रविडाना दडपीत व हटवीत विंध्यपर्वतापर्यंत पसरल्या. या लोकांमध्ये द्रविड स्त्रिया स्वीकारण्याचे प्रमाण वाढतच गेले. कारण हे आक्रमण सडेसोट लढवय्या लोकाकडूनच होत असते. या आर्यांच्या टोळ्यांस निरनिराळीं नावे असावी. एका काळी उज्जनीजवळ असलेल्या एका टोळीला महरट्ट किंवा मरहट्ट म्हणत असत असे आपणास महावंशावरून दिसून येते.

## विंध्यपर्वताशी द्राविडांबरोबर झुंज.

या आर्यांना पहिला मोठा विरोध विंध्यपर्वताशी झाला. बरेच दिवस विंध्य ही आर्यांची दक्षिण सरहद्द होती. आर्यां-

वर्त हें नांव विंध्य व हिमालय यांमधील प्रदेशास होते असे मनु ह्मणतो. ( अ. २। २१, २२ ) विंध्यपर्वताच्या आश्रयाने द्रविडानी आर्य मराठ्यांचा मार्ग बराच काळ अडविला असावा. द्रविडांचा जोर हे एक आर्यावर्तावर संकट मानण्यात आले व विंध्यपर्वताला ह्मणजे त्या पर्वताच्या आश्रयाने राहाणाऱ्या द्रविडाना कोणत्याही उपायाने नमविणे जरूर वाटले. अगस्त्याच्या पुढारीपणाखाली मराठ्यानी हा पर्वत ओलांडून वऱ्हाडात दक्षिणेतील पहिली वसाहत केली. या कारणाने या काळापासून द्रविडाकडून मराठ्यांस आर्य ह्मणण्यात येऊ लागले. विंध्यपर्वत उंच उंच वाढल्याने आर्यावर्तावर मोठे संकट आले अशी कथा पुराणात आहे तिचा सारांश वर दिल्याप्रमाणे आहे.

## गोदावरी नदीवरील द्राविडांशी झटापट.

मराठ्यानी जास्त जास्त मुलुख व्यापण्याची खटपट करावी व द्रविडानी त्यांस अडवावे असा प्रकार अनेक वर्षे चालला असावा. पूर्वी जशी विंध्य ही हद्द आर्य व द्रविड यांच्यामध्यें होती, तशी हद्द कालांतराने गोदावरी नदी झाली. तिच्या उत्तरेस आर्यांची वस्ती व अंमल आणि दक्षिणेस द्रविडांची वस्ती व अंमल, अशी स्थिति बराच दीर्घकाल टिकली असावी. आजच्या संकल्पांत युगगणना व मनु वगैरे सांगून स्थान निश्चित करतांना जंबुद्वीपे भरतवर्षे दक्षिणापथे रामक्षेत्रे बौद्धावतारे दण्डकारण्ये देशे शालिवाहनशके संधौ वर्तमाने गोदावर्याः दक्षिणेतीरे ( वाउत्तरेतीरे ) असे म्हटले जाते. स्थल सांगताना गोदावरी नदीवरून उत्तरतीराच्या बाजूचा किंवा

दक्षिण तीराच्या बाजूचा देश या शब्दाचे विशेष महत्व होते. या कारणाने खुद्द गोदावरीचेही महत्व पवित्रपणाच्या दृष्टीने वाढले. गोदावरीच्या उत्तरेस आर्यांचा ( मराठ्यांचा ) अंमल व दक्षिणेस द्रविडांचा मुलूख अशी स्थिति बराच काळ राहिली; पण तो काळ धामधुमीचा व चढाईचा. हमेश भांडणे व लढाया या सरहद्दीवर ठिकठिकाणी चालू राहाणे स्वाभाविकच होते. हा केवळ तर्क नाही. याला आधार आचारपरंपरेचा आहे. नाशीक व पंचवटी ही गावे गोदावरीच्या दक्षिण व उत्तरतीरावर असून त्यांचा निकट संबंध आज बरीच शतके आहे व आता तर दोन्ही एकाच म्युनिसीपालिटीखाली आहेत. पण पूर्वीपासून ही दोन गावे पृथक् असून एका काळी त्यांचेमध्ये मोठे हाडवैर असले पाहिजे. कारण आजही नागपंचमीच्या दिवशी संध्याकाळी दोन्ही गांवच्या अशिक्षित वर्गाच्या स्त्रिया आपआपल्या नदीकाठावरून प्रतिपक्षावर शिव्यागाळींचा वर्षाव करीत असतात. सध्याच्या काळी हा एक धर्माचा आचारच झाला आहे. त्याचप्रमाणे नाशिक व नगर जिल्ह्यांतून ही नदी वाहाते. त्यापैकी बऱ्याच ठिकाणी उभय तटांच्या गांवकऱ्यांमध्ये लुटुपुटूची लढाई होत असते. तीत उत्तरेकडील तीराचे लोक जिंकावयाचेच व दक्षिणतटाचे लोक हरलेच पाहिजेत. हा आचार पाळला नाही तर पाऊस बरोबर पडणार नाही अशी त्यांची श्रद्धा आहे. यासाठी हा आचार उभय गावचे लोक अगदी भाविकपणे पाळतात. " गोदावर्याः दक्षिणेतीरे " हा संकल्पांतील भाग व वर सांगितलेल्या प्रकारच्या चाली यांचा एकत्र विचार

केला असता आर्य व द्रविड या दोन मानववंशांची गोदावरी ही एका काळी मोठी चुरशीची सरहद्द होती व ती उल्लंघण्यासाठीं मराठ्यानी व त्यांस प्रतिबंध करण्यासाठी द्रविडानी फार धडपड केली असावी. ती सीमा उल्लंघून मराठे दक्षिणेत घुसलेच; पण आता द्रविडास मागे हटण्यास फारशी सवड नव्हती. सर्व मुलुख व्यापलेला होता.

## आर्य व द्रविड एक होतात.

ह्मणून आर्य व द्रवीड एकत्र राहू लागले. आर्य संस्कृति व आर्य धर्म यांचा पगडा द्रविडांवर जास्त जास्त पडू लागला. त्यांच्यातील सलोखा जास्त वाढू लागला व ह्मणून त्यांच्यातील चुरस कमी झाली. राज्यलोभाने मराठ्यांतील धाडशी पुरुष केपकामोरीनपर्यंत तरवार चालवीत गेले व त्यांपैकी बऱ्याच घराण्यानी निरनिराळी संस्थाने स्थापून राज्यही केले. पुष्कळ मराठे दूरवरच्या प्रांतात राहात असता आसपासच्या द्रविडात मिसळूनही गेले.

कोणकोणत्या देशावर कोणत्या काली कोणत्या वंशानें राज्य केले, त्यांतील सम्राट कोण झाले व त्यांचा अंमल किती दिवस चालला, वगैरेचा इतिहास रा. चिंतामणरावानी आपल्या मध्ययुगीन भारत ग्रंथात सविस्तर दिला आहे, त्याची पुनरुक्ति करण्याची जरूर नाही. या कालांत चालुक्य, कदंब, मोरे, पल्लव, यादव, शिंदे वगैरे घराण्यानी मोठमोठी राज्ये व साम्राज्ये स्थापिली व शतकेच्या शतके ती त्यानी मोठ्या ऐश्वर्याने चालविली आहेत

## मराठे व द्रविड यांचे बेमालूम मिश्रण.

मराठे हिंदुस्थानात आल्यापासूनच द्रविड बायकांशी विवाह करणे त्यांना हळूहळू भाग पडू लागले. जसजसे ते दक्षिणेकडे येऊ लागले तसतशी या मिश्रणाची गति वाढू लागली; व आजच्या महाराष्ट्रात कायमची वसाहत झाल्यावर तर हे मिश्रण जास्त प्रमाणावर झाले.पण एवढ्यावरच थांबले असेल असे दिसत नाही. ज्या ज्या लढाऊ द्रविड घराण्यातील मुली यानी घेतल्या त्या त्या घराण्यांचा तेवढ्यापुरताच संबंध झाला असे ह्मणण्यास आधार नाही. मराठे वंशातील मुली देऊनही स्नेहसंबंध जास्त प्रमाणावर वाढला व पर्यायाने ती सर्व घराणी मराठ्यांत सामील झाली. याच कारणामुळे मराठ्याच्या बायकांत गळ्यांतील मंगळसूत्राला पहिले स्थान मिळणे व मराठ्यामध्ये देवकाची चाल घुसणे या दोन गोष्टी शक्य झाल्या. हा मराठे-द्रविडांचा संयोग निरनिराळ्या तऱ्हेच्या पुराव्याने यापुढे दाखविण्यात येईल. त्या वेळी मंगळसूत्र, देवक वगैरे बाबींचा जास्त विचार होईल.

आतापर्यंतचे विवरण मुख्यत्वे मराठा ज्ञातीला उद्देशून केलेले असले तरी ते महाराष्ट्रातील बऱ्याच मोठ्या भागास लागू पडेल. विशेषतः वरच्या मानलेल्या ब्राह्मणादिक ज्ञातीस ते बहुतेक लागू पडण्यासारखे आहे. या बाबतीत न्यायमूर्ति रानडे यांच्या Rise of the Maratha Power या ग्रंथांतील पुढील उतारा महत्त्वाचा आहे. रानडे हे महाराष्ट्रातील सर्वांस अनुलक्षून लिहीत आहेत:—

" The history of the country has been dominated by the character of the people. In Northern India, the element of the Aryan race has predominated to an extent which dwarfed the aboriginal racés and drove them into the hilly parts of the country. In the Southern Peninsula the Dravidian races have maintained their predominant position, the Aryan element being not powerful enough to impress its stmap upon the population generally. By reason of its position between the two divisions the tableland of Mahârâshtra has been inhabited by a population in which the Aryans and the Dravidians have been mixed in due proportion, so as to retain the good points of both without exaggerating their defects. The mixure of the two elements is best illustrated by the peculiarities of the language, whose base is Dravidian, but whose growth and structure have been entirely fashoned by Aryan influences........

The Aryan element itself includes in Maharashtra a due mixture of the first settlers, as also of the subsequent Scythian invaders. The non-Aryans similarly include the aboriginal, Bhils, Kolis, and Ramoshis and other low classes as also the higher Dravidian elements.

Owing to this due proportion on the different ethnic elements in the population the institutions and the religion of the country have

maintained an equilibrium which is rarely found in other parts of India."

## कोंकणांत मराठे.

महाराष्ट्र देशापासून कोंकण हा प्रांत पूर्वीपासून निराळाच आहे. याचेही उत्तर कोंकण अथवा अपरांत व दक्षिण कोंकण अथवा नुसते कोंकण असे दोन भाग आहेत. यांतील अपरांताबरोबर उत्तरेकडील बुद्ध धर्माचा संबंध अशोककालींच आला होता. ह्मणून बुद्धाचे स्तूप वगैरे त्या प्रांतांत सांपडतात अपरांतावर यादवांनी राज्य केले आहे. तेथील सध्याची भाषा मराठी आहे. पण तेथे मराठा जातीची फारशी वस्ती नाही. मार्कंडेय, वायु व विष्णुपुराणातील अपरांतक महाराष्ट्रापासून निराळाच सांगितला आहे.

कोकणातील रत्नागिरीच्या भागांत मात्र मराठ्यानी फार दिवसापासून धुमाकूळ चालविल्याचे दिसत आहे. मराठ्यांच्या अमदानीत तर उत्तर व दक्षिण कोंकण, गोवें खेरीज करून, मराठ्यांच्या छत्राखालीं आले होते.

## राज्यप्रसाराबरोबर भाषाप्रसार होतोच असे नाही.

मराठ्यांनी आपली राज्यसत्ता शक्य तेथे स्थापिली; पण आपली भाषा जितांवर लादण्याचा प्रयत्न केला नाहीं. देवगिरी, हंपी वगैरे सर्व राजे तेथील देशी भाषेतच कारभार चालवीत. देवगिरीच्या यादवांची सर्व शिलाशासने कानडी भाषेतच आहेत. खुद्द मुंबई शहर इंग्रजांच्या हाती येऊन तेथील कारभार त्यांच्याकडे आला, तेव्हां येथील भाषा कानडी होती असे त्यांस आढळले व तेही आपले हुकूम त्याच भाषेत

सोडीत असत. येथील मूळची वस्ती कोळी वगैरे द्रविडी लोकांची होती. त्यांची भाषा कानडीच असणार. मुंबईची भरभराट होऊ लागली तसे आसपासचे लोक येऊन राहू लागले ; त्यांपैकी बहुतेक मराठी बोलणारे ; त्यामुळे बिचारे अशिक्षित कोळी वगैरेस मराठी भाषा घ्यावी लागली. महाराष्ट्रातही मराठ्यांची सत्ता वाढू लागली तशी त्यांची भाषाही प्रबळ होत चालली व कानडी भाषेची पिछेहाट झाली.

## मराठी भाषेचा फैलाव.

मराठे यादव देवगिरीस राज्य करीत असता त्यांना आपली भाषा जितांवर लादता आली नाही ; पण त्यांच्या आश्रयाने मराठी ग्रंथ होऊ लागले. त्यांच्या पश्चात् मुसलमान सत्ता झाल्यावर मराठीस चांगले दिवस आले. बाहमनी बादशाही व नंतर तिच्यांतून निघालेल्या पाचही शाह्या मराठीच्या मोठ्या पुरस्कर्त्या होत्या ; त्यामुळे मराठी ही कामकाजाची भाषा झाली. शहाजी राजे यानी कर्नाटक जिंकून धारवाडपासून बंगलोर व तंजावरपर्यंत राज्य कमाविले. त्या वेळीही मराठी हीच मुख्य भाषा होती. सन १८१६।१७ सालापर्यंत म्हैसूरचे दप्तर मराठीत होते व राजाचे सर्व हुकूम मराठी भाषेत सुटत असत. टिपू सुलतान यांचीही आज्ञापत्रे मराठी भाषेतच होती. हिंदु देवस्थानांची व्यवस्था कोणत्या तत्त्वावर चालावी याविषयी टिपूने काढलेला हुकूम मराठीतच होता, व त्यातील तत्त्वाप्रमाणेच आजही म्हैसूरच्या देवस्थान किंवा मुझराई खात्याची व्यवस्था चालते. टिपू हा हिंदु धर्माचा

द्वेष्टा होता अशी त्याची अपकीर्ति परकीयानी आपल्या हेतु-सिद्ध्यर्थ केली असली पाहिजे.

## मराठे लोकांची नावे.

बाप्यांची बहुतेक नावे पुराणातील देवांची किंवा वीर पुरुषांची असतात. काही नावे धोंडा, दगड, केर, फकीर, भिकू अशीही ठेवण्यात येतात. मुले जगत नसली ह्मणजे अशी क्षुद्र नावे ठेवण्याची वहिवाट आहे. मराठ्यांत अभिमान जागा असल्याने त्यांच्या नावास सिंह, सिंग, जी, राव, राजे अशी उपपदे लावण्यांत येतात. यांतील सिंग हा उघड उघड सिंहाचा अपभ्रंश आहे. जी हाही तसाच अपभ्रंश आहे, हे थोड्या विचारांती कळते. सिंह सींह सीं सी शी ( जसे नरशी मेहता, ) जी, अशा पायरींने जी हे उपपद मराठीत आले आहे. ‘ एव्हां प्रत्येक मऱ्हाठ्याच्या नांवास “ जी ” सन्मानार्थक जोडली जाते ती या “सिंह” शब्दाचा अपभ्रंश. ’ पाहा रा. रा. भा. कृत म. सं. चा. उ. ७२. धनसिंग किंवा धनाजी अशा दोन्ही तऱ्हेने बखरींत जाधव सेनापतीचे नाव आढळते. शिवाजी ह्मणजे शिवजी, शिवसिंह. राव, राजे, राणे ही उपपदे समानार्थी आहेत. पुरुषांच्या या उपपदांची परंपरा उत्तरेकडील ह्मणजे आर्यांची आहे.

## बायकांत द्रविड संप्रदाय.

बायकांची नावेही पुराणातील देवींची किंवा प्रसिद्ध स्त्रियाची असतात. याशिवाय गावोगावच्या देवी, नद्या व

स्त्रीलिंगी नक्षत्रे वगैरेचीही नावे आढळतात. पुरुषाप्रमाणेच सन्मानार्थी बायकांच्या नावापुढे अव्वा, आऊ, आई, अक्का, बाई अशी उपपदे लागतात. ही एकाच अर्थाची बहुशः आहेत. कानडी भाषेंत अव्वा शद्बाचा अर्थ " आई " असा आहे. आऊ, आई हे शद्ब अक्काचेच पर्याय आहेत. बायकांच्या उपपदावरून त्यांच्यामध्यें द्रविडपरंपरा कायम राहिली आहे असे उघड दिसते. सध्याच्या काळी ही उपपदे गाळण्याची प्रवृत्ति वाढत चालली आहे. उत्तरेकडील आर्यांच्या अनुकरणाने देवी किंवा कुवर वगैरे नावे आता घेण्याची सुरवात झाली आहे, पण खरी परंपरा बायकांच्या नावाची द्रविडीच आहे.

## मराठ्यांची गोत्रे

मराठे हे क्षत्रिय आहेत व आर्यवंशीय आहेत याविषयाचा पुरावा कुलपति चिंतामणरावजी वैद्य यानी आपल्या मध्ययुगीन भारत या ग्रंथात भरपूर दिला आहे. तो मला मान्य आहे व त्याविषयी आता यापुढे मोठा वाद उपस्थित होईल असेही वाटत नाही.

मराठ्यांच्या ९६ कुळी आहेत व त्या सूर्य, चंद्र, शेष व अग्नि अशा चार कुलात विभागल्या आहेत असे कै. श्री. नागोजीराव पाटणकर यांच्या क्षात्रवंशसागर ग्रंथावरून दिसते. यातील अग्निवंश हा कसा काल्पनिक आहे, हे चिंतामणराव वैद्यानी ' अग्निकुलकल्पना खोटी ' या प्रकरणात उत्तम रीतीने दाखविले आहे. त्याचप्रमाणे अग्निकुळ ह्मणून मानली जाणारी

प्रतिहार, चाहमान, परमार ही कुळे सूर्यवंशी व चालुक्य सोमवंशी, असेही त्यानी पृथ्वीराज रासाच्या पूर्वीच्या शिलालेखादि निर्विवाद पुराव्याने सिद्ध केले आहे.

## गोत्र व ऋषिवंश एकच काय?

रजपूत हे वैदिक आर्य आहेत हे सिद्ध करण्याकरिता मध्ययुगीन भारत भाग २, प्रकरण ५ यात रा. वैद्य ह्मणतात " अनेक वैदिकसूत्रांनीं घालून दिलेल्या या गोत्रप्रवर पद्धतीनें हिंदु आर्यांत जशी आपल्या **वंशोत्पत्तीची** स्मृति कायम राहिलेली आहे, तशी ती जगांत कोणत्याही इतर लोकांत राहिलेली आढळून येत नाहीं. या गोत्रप्रवरांचा उच्चार करणाऱ्या प्रत्येक माणसाला प्रत्यही ज्यांच्या वंशांत आपण जन्माला आलो त्या आपल्या वैदिक पूर्वजांचें स्मरण घडत असतें. " यावरून गोत्रपुरुषापासून खरोखर त्या त्या गोत्राच्या क्षत्रियांची उत्पत्ति झाली असे होते.

परंतु ' पुरोहितप्रवरो राज्ञाम् ' असे सूत्रात सांगितले असून याज्ञवल्क्यस्मृती वरील सुप्रसिद्ध मिताक्षरा टीकेच्या कर्त्याने क्षत्रियास गोत्रे नाहीत, त्यानी आपल्या पुरोहिताची गोत्रे वापरावी व त्या गोत्रावरून लग्ने ठरवावीत असा नियम घालून दिलेला आहे. हा पुरावा विश्वसनीय नाही ह्मणजे या सूत्रवचनाचा अर्थ करण्यात चूक झाली आहे असे दाखविण्याचा मोठा प्रयत्न वैद्यास करावा लागला आहे. वैद्य म्हणतात: " विज्ञानेश्वराच्या मिताक्षरेतील नियम चुकीचा आहे याबद्दल आह्मास अणुमात्र संदेह नाहीं. "

गोत्र आणि प्रवर या मथळ्याची एक स्वतंत्र टिप्पणी लिहून आपल्या सिद्धांताला विरोध करणारी जी जी प्रमाणे प्रतिपक्षाकडून पुढे मांडण्यात येतील असे वैद्यास वाटले, त्यांचे खंडन त्यानी केले आहे. गोत्रऋषीपासून उत्पत्ति असे ह्मणणे ह्मणजे क्षत्रियांची उत्पत्ति ब्राह्मणापासून झाली असे ह्मणावे लागेल या मुद्याच्या खंडणावर त्यांचा विशेष भर आहे. “ ऋग्वेदातील मंत्रद्रष्टे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तिन्ही वर्णांतील आहेत. यामुळें त्यांचीं नावें प्रवरऋषींत येणारच; पुष्कळ क्षत्रिय ब्राह्मण झाले आहेत व या रीतीनें क्षत्रियांचे पूर्वज होण्यास पात्र आहेत ” पृष्ठ ७६ वर वैद्यानी सिद्धांत काढला आहे तो:—“ ब्राह्मण व क्षत्रिय यांचीं गोत्रें व प्रवर हीं एकच आहेत आणि प्रवर ऋषींत सुप्रसिद्ध अशा पुष्कळ क्षत्रिय राजांचींही नांवें आहेत; अर्थात महाभारतांत स्पष्ट ह्मटल्याप्रमाणें एक काळ असा होता कीं, जेव्हां वर्णभेद हे आजच्यासारखे अनुल्लंघनीय झाले नव्हते, तेव्हां वस्तुत: भारती आर्य असा एकच वर्ण होता. ” याप्रमाणे गोत्रऋषीपासून क्षत्रियांची उत्पत्ति आहे, असे वैद्यानी प्रतिपादिलेलें आहे.

वैद्यांचा अधिकार फार थोर आहे. त्यानी प्रतिपादिलेले मत स्वीकारण्याची साहजिक प्रवृत्ति होते; पण दुसऱ्या बाजूलाही विज्ञानेश्वरासारखे थोर पुरुष आहेत. अशा वेळी कोणाचे मत मान्य करावे हा विचार पडतो. माझ्या अल्प बुद्धीला वैद्याचे मत ग्राह्य करवत नाही, याबद्दल वाईट वाटते. पण सत्यान्वेषण हे मोठे महत्त्वाचे कर्तव्य आहे, हे कुलपतींनाही मान्य असणारच.

अर्वाचीन रजपूत घराण्याची व त्यांच्या पुरोहितांची गोत्रे या मथाळ्याची टिप्पणी दुसऱ्या भागाच्या६४ व्या पृष्ठावर त्यानी दिली आहे तीवरून घराण्याचे व पुरोहिताचे गोत्र भिन्न असल्याने पुरोहिताचे गोत्र क्षत्रियानी घ्यावे, त्याना स्वतःचे गोत्र नाही, असे ह्मणणाऱ्याचे खंडण आपोआप होते असे दाखविले आहे. उदेपूर राजघराण्याचे गोत्र बैजवाप. पण तेथील पुरोहिताचे गोत्र सास्तायन आहे. अशीच स्थिति आणखी सात घराण्यांची आहे. बाकी सात घराण्यांच्या पुरोहितांची गोत्रे दिलीच नाहीत. तेथे बहुधा राजाचे व पुरोहिताचे गोत्र एकच असेल या यादीवरून वैद्य म्हणतात त्याप्रमाणे पुरोहिताच्या गोत्राप्रमाणे राजाचे गोत्र असतेच असे नाही. राजाचे गोत्र भिन्न असू शकते हे सिद्ध होते; पण मुख्य मुद्दा तो नव्हे. गोत्रऋषिपासून त्या त्या राजघराण्याची उत्पत्ति झाली काय? हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. वैद्य अशी उत्पत्ति झाली असे ह्मणतात.

## ऋषिसंतति ह्मणण्यास अडचणी.

पण त्यानीच दिलेली वरची यादी पाहू. यात उदेपूर, जोधपूर, जयपुर, काश्मीर येथील राजे सूर्यवंशी असून पहिल्याचे गोत्र बैजवाप, दुसऱ्याचे गौतम, तिसऱ्याचे मानव, चौथ्याचे भारद्वाज असे दिले आहे. चंद्रवंशातील भावनगरचे राजे गौतमगोत्री आहेत. जोधपूरचे सूर्यवंशीही गौतम गोत्रीच. एकच ऋषि दोन वंशात जन्म घेऊन दोन राजघराणी उत्पन्न कर्ता झाला, हे ह्मणणे मान्य करण्यास कठिण आहे.

ही यादी त्रोटकच असल्याने दुसरी क्षात्रवंशसागराची घेऊं या. चंद्रवंशातील सोमशर्मा राजा याचे पुत्र सहा:—१ चव्हाण, गोत्र विशिष्ठ; २ मोरे, गोत्र गौतम; ३ पवार, गोत्र वसिष्ठ; राष्ट्रकुंड, गोत्र गर्ग; ५ धामपाळ, गोत्र काश्यप ६ अनंग, गोत्र अत्रि.

सूर्यवंशांतील सुमित्र राजा याचे पुत्र सात:—१कदम गो. कपिल; २ निकम, गो. पराशर; ३ धटिक, गो. अगस्ति; ४ काळमुख, गो. कश्यप; ५ शेलार, गो. विश्वामित्र; ६ प्रोकट, गो. अंगिरा; ७ प्रतिहार, प्रोकटप्रमाणे. सूर्य व चंद्र वंशात कश्यपगोत्र एकेकास आहे.

एकाच वंशांतील पुरुषास भिन्नभिन्न गोत्रे कां, हाही प्रश्न राहातोच. या गोत्राचे पुरुष ऋषि होऊन त्यापासून पुढील संतति झाली असे मानणे कठिण आहे.

शांतिपर्वांत ( अ. २९६ ) अंगिरा, कश्यप, वशिष्ठ व भृगु अशी चारच मूळ गोत्रे आहेत. बौद्धायनाच्या वचनाप्रमाणे ही आठ झाली:—१ विश्वामित्र, २ जमदग्नि, ३ भरद्वाज, ४ गौतम, ५ अत्रि, ६ वशिष्ठ, ७ कश्यप, ८ अगस्त्य. या गोत्रऋषींची संख्या आता ४९ झाली आहे.

" यद्यपि गोत्राणि अनंतानि ' गोत्राणां तु सहस्त्राणि प्रयुतान्यर्बुदानि च ' इत्युक्तेस्तथापि ऊनपंचाशदेव गोत्रभेदा:।" ह्मणजे जरी सहस्र (हजार), प्रयुत (दशलक्ष), अर्बुद ( दशकोटि ) अशी गोत्रसंख्या असल्याचे वचन आहे, त्याप्रमाणे गोत्रे अनंत आहेत. तरी आज गोत्रांचे भेद ४९ च आहेत.

ही दशलक्ष किंवा कोट्यावधि गोत्रे अस्तित्वांत होती तेव्हा तितके निरनिराळे गोत्रप्रवर्तक ऋषि होते असे मानावयाचे काय? मग ही ऋषींची नावे कोठेच का आढळू नयेत? दुसरा प्रश्न येतो की, ४९ खरीज बाकीची गोत्रे कोठे गेली? त्या गोत्रांचा वंशक्षय झाला किंवा ते परदेशात गेले? त्यांचा विस्तार होऊ नये व त्यांची खूण राहू नये व या ४९ चाच वंश राहावा, हे एक आश्चर्यच ह्मणावयाचे! याप्रमाणे विचार केल्यास गोत्र ह्मणजे ऋषिसंतति ही व्याख्याच विचाराच्या कसोटीवर खरी ठरत नाही. ब्रह्मदेवाने प्रथमतः मानसपुत्र ह्मणजे गोत्रऋषि उत्पन्न केले व त्यांच्यापासून सर्व मनुष्यजात उत्पन्न झाली असे ह्मटल्यास त्यात गोत्राचे महत्त्व राहात नाही. ज्यांच्यापासून प्रजा झाली ते सर्वच मानसपुत्र गोत्रपुरुष नाहीत. अशा गोत्रपुरुष नसलेल्यांच्या वंशात कोणी ब्राह्मण क्षत्रियच पैदा झाले नाहित असे ह्मणावयाचे काय?

बरे ही मानसपुत्राची कल्पना मान्य केल्यास सृष्टि उत्क्रान्तीच्या तत्वाप्रमाणे उत्पन्न झाली, या सिद्धांतास फाटा द्यावा लागतो. ऋषींपासून सर्व मनुष्यजात उत्पन्न झाली असे ह्मणावे तर हिंदी आर्यांखेरीज गोत्रे कोणीच लावीत नाहीत. त्यास गोत्रांची माहिती मूळापासूनच नसावी किंवा ते ती माहिती कालांतराने विसरले असावे, अशा अनेक शंका येतात. ऋषींचा वंश ह्मणजे गोत्र असा जो गोत्र शब्दाचा अर्थ मानला आहे, तोच निराधार आहे. केवळ बाबावाक्यं प्रमाणं या

न्यायानें जबरदस्तीनें तो मानावयाचा आहे. गोत्र शद्वाचे अवयव जे गो+त्र यांच्याशीं या अर्थाचा कांहींच संबंध लागत नाहीं. इत्यादि गोष्टी लक्षात घेता ज्या ऋषीपासून उत्पत्ति झाली त्याच्या नांवचे गोत्र सांगण्यात आले असे ह्मणण्यास मोटी अडचण येत आहे.

## रजपुतांत वंशास गोत्र ह्मणत.

मध्ययुगीन भारत भाग ३, पान २९३ येथे ( भेराघाट लेख ए इ १ पान १० ) गुहिलोत घराण्यांतील आल्हणदेवीचा कोरीव लेख दिला आहे, त्यांत तिची कुलपरंपरा दिली आहे. " गोभिल गोत्रांत हंसपाल राजा झाला. " इत्यादि. रा. रा. वैद्य ह्मणतात, " या वर्णनावरून दोन तीन गोष्टी दिसतात. रजपूत लोक कुलनांवालाच या वेळीं गोत्र मानूं लागले. गोभिल ह्मणजे गोहिलकुल नांव होतें. रजपूत ऋषि गोत्र कमी महत्वाचें मानूं लागले असावे. कारण ऋषिगोत्र पुरोहिताचें आहे, अशी कल्पना या वेळीं चालू झाली. या वेळच्या कुलनामांसच गोत्र ह्मटलेलें कित्येक लेखांत आढळतें. "

कुलनामास गोत्र ह्मणण्याची मूळची वहिवाट होती. तीवरून रजपूत ऋषिगोत्र कमी महत्वाचे मानू लागले असे नसून गोत्रांची नावे बदलून ऋषींच्या नावावर ते पुढे आले आहेत, असे मला वाटते. एक वेळ गोत्र ठरले ह्मणजे पुढे उपाध्याय बदलला तरी गोत्र बदलत नाही, असा रा. वैद्यप्रभृतींचा आग्रह आहे. पण अशी गोत्रे राम व कृष्ण या प्रसिद्ध अवतारी पुरूषांच्या वंशात बदलल्याचे दाखले आहेत.

दशरथ व जनक दोघेही सूर्यवंशी इक्ष्वाकूचे वंशज. इक्ष्वाकूचा वसिष्ठ हा पुरोहित. इक्ष्वाकूचा दुसरा पुत्र निमि याला यज्ञ करावयाचा होता. वसिष्ठ इंद्राकडे यज्ञात गुंतले होते. ते परत येईपर्यंत निमि थांबला नाहीं. शतानंद गौतमाला पुरोहित करून यज्ञ सुरू झाला. वसिष्ठ परत आल्यावर त्यानी रागावून निमीला शाप दिला ; निमीनेही उलट तसेच केले. पण शतानंद पुरोहित झाला तो झालाच. निमीच्या वंशात जनक व त्याचा भाऊ उत्पन्न झाले व त्यानी आपल्या तीन मुली दशरथाच्या भरत, लक्ष्मण, व शत्रुघ्न अशा तीन पुत्रांस दिल्या. सीतेला यात धरण्याची जरूरी नाही, कारण तिचा जन्म जनकाच्या कुळातील नव्हे. हे विवाह सगोत्रात झाले असे मानले तर सगोत्र विवाहास हरकत नाही असे ह्मणावे लागेल. बरे, हे सगोत्रविवाह नव्हते असे ह्मणावयाचे असल्यास दशरथ किंवा जनक यांपैकी एकाचे गोत्र केव्हा तरी बदलले होते असे ह्मणावे लागेल. पुरोहित बदलण्याच्या वेळी ते बदलले गेले आहे असे ह्मणणे ओघानेच येते. तसे मानल्यासच सगोत्राची अडचण दूर होते.

श्रीकृष्ण यदुवंशीय. बाप वसुदेव, आई देवकी. देवकी कंसाची बहीण. कंसही यदुवंशीयच. या विवाहास गोत्राची अडचण आली नाही. सत्राजित यादव. त्याची मुलगी सत्यभामा ही कृष्णाची आवडती बायको. या वेळीही गोत्राची अडचण आली नाही. ती अडचण काढून टाकण्याचा कोणता तरी सर्वमान्य असा मार्ग होता. तो कोणता हे विज्ञानेश्वरानी पूर्वीचे आचार लक्षात घेऊन मिताक्षरेत दाखविला आहे.

" पुरोहितप्रवरोराज्ञां " या सूत्राचा अर्थ करण्यात विज्ञानेश्वराची चूक झाली व त्याला आधार नाही, असे ह्मणणे धाडसाचे आहे. गोत्र शद्बाचा अर्थ ऋषिसंतती असा करणेच चुकीचे होय.

रजपूत राजे आपल्या गोत्रपुरुषांची नावे सांगतात तरी विवाह सगोत्रांत करण्यास भीत नाहीत. वैद्य एका खासगी पत्रांत ह्मणतात, " आतां रजपुतांनीं सगोत्र विवाहनिषेध पाळला नाहीं हें खरें. कारण चूडासमा, जाडेजा आणि जाधव हे तीन्ही अत्रिगोत्री असून यांच्यांत परस्पर संबंध होतात. "

असगोत्र विवाहाची परंपरा कशी उत्पन्न झाली ह्या विषयींचे विचार मी एका व्याख्यानात विद्वानांपुढे पुण्यास सुमारे १५ वर्षांपूर्वी मांडले होते. आता पुन्हा त्याविषयी विशेष चर्चा नको.

## गोत्र शद्बाचा खरा अर्थ.

पण आजच्या भाषेतील सरदारांचे " गोट , " मराठी शद्ब गोत व गोतवळा ; तसेच गावठाण व गोठण या सर्वांचा विचार केल्यास गोत्र शद्बाच्या खऱ्या अर्थावर थोडाबहुत प्रकाश पडेल. आजच्या वर्तमानपत्रात सिंधप्रांतातील पीरपगडो याचे नाव वारंवार येते. याचा अर्थ पगडीवाला पीर असा आहे व त्याचे गाव पीरजोगोट अशा नावाचे आहे. आमच्या मालवणी भाषेत ' पीरचो गांव ' असे भाषांतर होईल. मराठींत पिराचा गाव आह्मी ह्मणू. अद्यापही पंजाबाकडे एक गाव ह्मणजे गोठ ह्मणजे एक कुटुंब किंवा एक बिरादरी समजतात. मग गावचे

लोक कोणत्याही जातीचे असोत. एका गांवच्या एका जातीच्या मुलामुलींत लग्नसंबंध होत नाही ह्मणजे त्यांचे एक गोत्र समजले जाते. अशी गांवे अनंत असल्याने गोत्रे अनंत आहेत, अर्बुददशलक्ष आहेत, या वचनाची संगती लागते. Census of India 1911, pege 252 यांत बडोद्याच्या रिपोर्टाचा उतारा घेतला आहे. त्यांत ह्मटले. आहे:—" The Rajput and Lewa Kunbis of Baroda regard all caste people living in the same village as related to each other and marriages must therefore be arranged with persons living elsewhere ."

## देवकावरूनही गोत्र नावे.

देवकांची गोत्रे झाल्याचीही उदाहरणे आढळतात. पाहा Census of India, p 250 " The Kachchhap ( tortise) which was a totem of many races and castes in Bengal has now often been changed to Kashyapa, the name of a Vedic saint." यावरून आपल्या कुलास मोठेपणा देण्यासाठीं गोत्रप्रवरांची नावे घेण्याची प्रवृत्ती महाराष्ट्राबाहेरही दिसून येत आहे.

गोत्राचे प्रवर्तक मूळ ऋषि आठ आहेत. हे आठच त्या काळचे पुरुष होते व बाकी कोणी अस्तित्वांत नव्हते, असें नाहीं. त्या वेळी जे लोक होते त्यांतील हे आठ प्रमुख नामांकित होते इतकेंच मानावें लागेल. बाकीच्या लोकांस संतति झाली नाही व यांसच मात्र झाली या गोष्टीवर विश्वास ठेवणे कठिण आहे. पण गोत्र ह्मणजे ऋषिसंतति असा अर्थ घेतल्यास बाकीच्यांस संततिच नव्हती असे मानावे लागेल.

याप्रमाणे विचार केल्यास गोत्र व प्रवर यांच्या अर्थाची जास्त छाननी झाली पाहिजे. सध्यांचा समज संशय उत्पन्न करण्यासारखा तरी आहे असे माझ्या अल्पबुद्धीस वाटते. याच कारणासाठीं मराठे लोकांच्या ग्रंथात दिलेल्या गोत्रावर जास्त जोर देण्याची जरूरी नाही; व गोत्रावरून मराठ्यांचे आर्यत्व शाबीद करण्यांत महत्व नाहीं. कारण गोत्राचा पुरावा डळमळीत व संशयास्पद आहे, कारण ऋषिसंतती असल्याने गोत्रऋषीचे नाव घेतले ही विचारसरणीच कबूल करता येत नाही.

## मराठ्यांचे देव.

प्रत्येक मराठा घराण्यांत एक कुळस्वामी असतो. मराठ्यांतील बरीच घराणी उत्तरेकडून आली. त्यांपैकी पुष्कळानी आपले कुळस्वामी बरोबर आणिले. काहींनी येथील पूर्वीच्या देवस्थानापैकी एखादे आपल्या कुळस्वामीचा अवतार म्हणून स्वीकारिले. मराठे हे मुख्यत्वे शिवाचे उपासक आहेत. म्हणून हे कुलदैवत शिव किंवा त्याचा एखादा अवतार, शिवाची बायको किंवा मुलगा या रूपाने असते. शिवा किंवा भवानी हे दैवत पुष्कळांचे आहे. द्रविडांनी स्कंद म्हणजे सुब्रह्मण्य हे दैवत विशेष महत्वाचे मानले.

भवानी व तिचे अवतार यांस मद्यमांसाचा नैवेद्य अवश्य असतो. बहुतेक वैष्णवी देवींना आतां गोडा नैवेद्यच मिळतो. पण कोल्हापूरच्या महालक्ष्मीसारख्या सोवळ्या देवीलाही आश्विन शुद्ध ८ च्या रात्री मद्यमांसाचा नैवेद्य चोरून दाखविण्याचा संप्रदाय आहे. यावरून याही देवता पूर्वी राजरोस मद्यमांसभोक्त्या होत्या असे म्हणता येते.

लोक कोणत्याही जातीचे असोत. एका गांवच्या एका जातीच्या मुलामुलींत लग्नसंबंध होत नाही ह्मणजे त्यांचे एक गोत्र समजले जाते. अशी गांवे अनंत असल्याने गोत्रे अनंत आहेत, अर्बुददशलक्ष आहेत, या वचनाची संगती लागते. Census of India 1911, pege 252 यांत बडोद्याच्या रिपोर्टाचा उतारा घेतला आहे. त्यांत ह्मटले. आहे:—" The Rajput and Lewa Kunbis of Baroda regard all caste people living in the same village as related to each other and marriages must therefore be arranged with persons living elsewhere . "

## देवकावरूनही गोत्र नावे.

देवकांची गोत्रे झाल्याचीही उदाहरणे आढळतात. पाहा Census of India, p 250 " The Kachchhap ( tortise) which was a totem of many races and castes in Bengal has now often been changed to Kashyapa, the name of a Vedic saint. " यावरून आपल्या कुलास मोठेपणा देण्यासाठीं गोत्रप्रवरांची नावे घेण्याची प्रवृत्ती महाराष्ट्राबाहेरही दिसून येत आहे.

गोत्राचे प्रवर्तक मूळ ऋषि आठ आहेत. हे आठच त्या काळचे पुरुष होते व बाकी कोणी अस्तित्वांत नव्हते, असें नाहीं. त्या वेळी जे लोक होते त्यांतील हे आठ प्रमुख नामांकित होते इतकेच मानावें लागेल. बाकीच्या लोकांस संतति झाली नाही व यांसच मात्र झाली या गोष्टीवर विश्वास ठेवणे कठिण आहे. पण गोत्र ह्मणजे ऋषिसंतति असा अर्थ घेतल्यास बाकीच्यांस संततिच नव्हती असे मानावे लागेल.

याप्रमाणे विचार केल्यास गोत्र व प्रवर यांच्या अर्थाची जास्त छाननी झाली पाहिजे. सध्यांचा समज संशय उत्पन्न करण्यासारखा तरी आहे असे माझ्या अल्पबुद्धीस वाटते. याच कारणासाठीं मराठे लोकांच्या ग्रंथात दिलेल्या गोत्रावर जास्त जोर देण्याची जरूरी नाही; व गोत्रावरून मराठ्यांचे आर्यत्व शाबीद करण्यांत महत्व नाहीं. कारण गोत्राचा पुरावा डळमळीत व संशयास्पद आहे, कारण ऋषिसंतती असल्याने गोत्रऋषीचे नाव घेतले ही विचारसरणीच कबूल करता येत नाही.

## मराठ्यांचे देव.

प्रत्येक मराठा घराण्यांत एक कुळस्वामी असतो. मराठ्यांतील बरीच घराणी उत्तरेकडून आली. त्यांपैकी पुष्कळानी आपले कुळस्वामी बरोबर आणिले. काहींनी येथील पूर्वीच्या देवस्थानापैकी एखादे आपल्या कुळस्वामीचा अवतार म्हणून स्वीकारिले. मराठे हे मुख्यत्वे शिवाचे उपासक आहेत. ह्मणून हे कुलदैवत शिव किंवा त्याचा एखादा अवतार, शिवाची बायको किंवा मुलगा या रूपाने असते. शिवा किंवा भवानी हे दैवत पुष्कळांचे आहे. द्रविडांनी स्कंद ह्मणजे सुब्रह्मण्य हे दैवत विशेष महत्वाचे मानले.

भवानी व तिचे अवतार यांस मद्यमांसाचा नैवेद्य अवश्य असतो. बहुतेक वैष्णवी देवींना आतां गोडा नैवेद्यच मिळतो. पण कोल्हापूरच्या महालक्ष्मीसारख्या सोवळ्या देवीलाही आश्विन शुद्ध ८ च्या रात्री मद्यमांसाचा नैवेद्य चोरून दाखविण्याचा संप्रदाय आहे. यावरून याही देवता पूर्वी राजरोस मद्यमांसभोक्त्या होत्या असे ह्मणता येते.

## शिव व भवानी.

कै. राजारामशास्त्री भागवत आपल्या " मराठ्यांसंबंधी चार उद्गार " पान १३ यांत ह्मणतात:--" प्राचीन मराठे सर्व शैव दिसतात "........" जसें शिवलिंगास तसेंच देवीस बकरें व कोंबडें व मद्य हीं तिन्ही चालतात. " पान १४: " खंडोबा व जोतीबा या दोन्ही मराठ्यांच्या देवता महाराष्ट्रांत सर्वत्र नांवाजलेल्या आहेत "........" जोतीबाप्रमाणेंच खंडोबाही शिवाचेंच रूपांतर समजण्याचा संप्रदाय आहे....." " बौद्धधर्मापेक्षां त्यांच्यांतूनच निघालेल्या जैन धर्माचा प्रसार महाराष्ट्रांत विशेष झालेला दिसतो. प्राचीन कोरींव लेणीं व शिलालेख महाराष्ट्रांत आहेत ते झाडून जैनांचे होत. ब्राह्मणधर्म महाराष्ट्रांत आला जैन धर्मानंतर. जैन धर्माचे लोक कौल लावणें व देवस्की शिकले पहिल्यानें शैवांपासून. शिवास व देवीस पूर्वी कोंबडें बकरें चाले व हल्लींही चालतें. जैन सर्व अहिंसावादी. तेव्हां रक्तपाताचा त्यांस मोठा तिटकारा. रक्तपात खेरीजकरून देवस्की जैनांनीं शैवांपासून घेतली. जैनधर्माच्या मागून ब्राह्मण आले. त्यांस देवस्की मिळाली जैन लोकांपासून. देवस्कींत " जैना ब्राम्हणा " असा जैनांचा पाठ पहिल्यानें येतो, व ब्राह्मणांचा नंतर येतो, तो यामुळें. पश्चिम महाराष्ट्रांत ब्राह्मणांनीं जैनांच्या मूर्ति होत्या त्या काढून टाकून आपल्या मूर्ति त्यांच्या ठिकाणीं ठेविल्या, हें वाडी प्रांतांत व इतर ठिकाणीं दोन प्रकारच्या पाथरी सांपडतात त्यावरून निर्विवाद होतें. तरी अहिंसेचें व्रत जैनांचें होतें, तें घेऊन महाराष्ट्रांत ब्राह्मणांनीं इतकें चालविलें कीं, जो हिंसा

करीत नाहीं व मत्स्यमांस खात नाहीं. तोच ब्राह्मण, व त्याच्याच घरचें पाणी पावन करणारे, असा सर्व ब्राह्मणेतर जातींचा समज झाला. हें जैनांचें महाव्रत ब्राह्मणांनीं महाराष्ट्र देशांत येऊन घेतलेलें दिसत नाहीं. महाराष्ट्र देशांत ब्राह्मण आले ते हें महाव्रत घेऊन नंतर आलेले."

पान २४: "मराठ्यांमध्यें बौद्ध किंवा जैन धर्माचा प्रसार झाला. शालिवाहन शकाच्या तिसऱ्या किंवा चौथ्या शतकांतील कदंब वंशांतील राजांचे लेख आहेत, त्या सर्वांत जिनाचें मंगलाचरण आहे. पद्मावीच्या शिलालेखांतही प्रायः आरंभीं जिनास नमस्कार केलेला असतो....जैन धर्म पाळणाऱ्या सर्व मऱ्हाट्यांनी मकारत्रयीचा अगदीं त्याग केला होता, असें मानण्याची गरज नाहीं. जे त्रयांचा त्याग करीत, त्यांस ते विरक्त व साधु एव्हांच्या प्रमाणें समजत इतकेंच........ जैनधर्म महाराष्ट्रांत तेलंगणांतून आलेला दिसतो."

पान २५: "चालुक्यांच्या व राष्ट्रकूटांच्यामुळें ब्राह्मणांचा पाय महाराष्ट्रांत शालिवाहन शकाच्या पांचव्या शतकाच्या आसपास पडूं लागला, व यादवांनीं त्यांचेंच व्रत पुढें चालविलें. वर निर्दिष्ट केलेल्या काळाच्या पूर्वी ब्राह्मण किंवा त्यांचा धर्म एका विदर्भ देशास सोडून इतरत्र महाराष्ट्रांत होता, असें ह्मणण्यास कांहीं प्रमाण नाहीं. ज्या ब्राह्मणांचा महाराष्ट्र देशांत पाय पडला, ते सर्व जैनांच्या सत्संगानें किंवा असत्संगानें पूर्वींच मद्यमांसत्याग करून बसलेले."

पृष्ठ ६२: "महाराष्ट्रांत ब्राह्मण आले ते अहिंसावादी झालेले असा लेख पूर्वी येऊन गेला आहे. त्यांनीं जो ब्राह्-

णीधर्म आणिला, तो यज्ञव्यतिरिक्त हिंसा गाळून टाकलेला वैदिक धर्म. या धर्मानें हळू हळू जैन धर्माची जागा बळकाविली. मूळचे शैव होते त्यांसही जैनांची संगति लागली, व शालिवाहनाच्या अकराव्या शतकांत बसव म्हणून महात्मा झाला, त्यानें जंगम धर्माची स्थापना केली. शैव व जंगम मूळचे एकच. ज्या शैवांनीं मद्य, मांस मत्स्य यांचा त्याग केला ते ' जंगम ' झाले. "

## नशीबवान भवानी.

यापुढे जुनी शिवमंदिरे जंगमांच्या ताब्यांत गेली व त्या देवळात मकरत्रय बंद झाले; पण जंगमानी शंकराला व नंदीलाच पतकरले, त्याच्या बायकोस ताब्यांत घेतले नाही. यामुळे भवानी व तिचे अवतार यांस मद्यमांसाचा नैवेद्य चालूच राहिला. पूर्वी शिव किंवा शंकर याची मूर्ति असे. ह्यूएन्त्संगाने काशी येथील शिवमंदिराचे वर्णन केले आहे. तो ह्मणतो:—

" या मंदिरांत दररोज १०००० शिवभक्त दर्शनास येत असून त्यांतील देवाची ( शिवाची ) पुरुषाकार मूर्ति जवळ जवळ सत्तर हात उंचीची असून फार सुबक व भव्य असल्यामुळें हुबेहूब सजीव माणसासारखी वाटे. "

जंगम ह्मणजे लिंगायत यानी शिवमूर्ति काढून टाकून सर्वत्र लिंगस्थापना केली. या जंगमधर्माचा प्रभाव मराठासमाजावर बराच पडला.

## पंढरपूरचा विठोबा.

बुद्ध व जिनधर्म यांतील सूक्ष्म भेद साधारण समाजाच्या आटोक्यात नाहीं. " अहिंसा परमो धर्मः " हें मुख्य

तत्त्व दोन्ही धर्मांस सारखेच मान्य आहे. बुद्धाला जिनही ह्मणतात. अमरकोषांतील बुद्धाच्या अठरा नावात जिन हेही नाव आहे. याप्रमाणे धर्मसंस्थापक व पुढे उपास्यमूर्ति झालेल्या बुद्धास जिन व बुद्ध अशी दोन्ही नावे असल्याने बहुजन-समाज या दोन धर्मांकडे एकत्वाने पाहू लागल्यास आश्चर्य नाही. या जैन व बुद्ध धर्मांचाही प्रभाव मराठ्यांच्या धर्मांवर व त्यांतील आचारविचारावर पडणारच. बुद्ध धर्म हिंदुस्थाना-तून नाहीसा झाला याचे कारण बुद्धाचे अनुयायी हिंदुधर्मांत आले हे आहे. हिंदुधर्माने खुद्द बुद्धालाच विष्णूचा अवतार बनविले. आमच्या रोजच्या संकल्पात " बौद्धावतारे " असे ह्मटले जाते. पंढरपूरच्या विठोबास बुद्धावतार ह्मणतात व हे महाराष्ट्राचे प्राचीन देवस्थान आहे. शके ११५९ ( सन १२३७ ) चा एक शिलालेख सदर देवळावर आहे. त्यात देवाचे नाव विठ्ठल असे आहे. मूर्तीची घडण व तीवरील वस्त्रे, पोषाख व अलंकार यावरून ती मूर्ति पांचव्या किंवा सहाव्या शतकांतील दिसते. पूर्वी ही जैनाची मूर्ति असावी. सामान्य लोक तिला बुद्ध ह्मणणार. पुढे जैन—बुद्धासारखे निवृत्तमांस अशा ब्राह्मणी धर्माची लाट उसळल्यावर बहुजनसमाज ब्राह्म-णधर्मी झाल्यावर विठ्ठलास ब्राह्मणी धर्माची दीक्षा मिळाली.

वर्णाश्रमधर्माच्या जुलमास त्रासलेल्या बहुजनसमाजांत सर्वांस समत्वाने लेखणारा बुद्धधर्म जोराने पसरला. हे सम-त्वाचे तत्त्व बहुजनसमाजास प्रिय होते. पंढरपूरच्या देवळात हा समत्वाचा संप्रदाय जैनाच्या वेळी होता तो तसाच चालू राहिला. ह्मणून महाराष्ट्राच्या धर्मसमजुतीवर व आचारविचारावर

याचा फार महत्त्वाचा परिणाम झाला आहे. यामुळे वारकरी संप्रदाय स्थापन झाला व त्यास भरभराटी आली आहे. वारकऱ्यात उच्चनीच भाव नाहीं. सर्व एका योग्यतेचे वैष्णव.

" विष्णुरूप जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद वर्म अमंगळ ॥"

— तुकाराम.

वर सांगितलेल्या शिलालेखात गावचे नाव पंडरिगे असे कानडी भाषेचे आहे. विठोबाचा रथ काढते वेळी एका जैन घराण्यास पागोटे मिळण्याचा हक्क आहे व देवस्थानच्या काही जमिनी त्या घराण्याकडे आहेत असे सांगतात. चौरायशींच्या शिलालेखात सेतवळ जाईदेवें या नांवावर ८४ व ओळीस देणगी जैनाची आहे यावरून पूर्वी हे स्थान मूळचे जैनाचे असावे या अनुमानास बळकटी येते.

कै. राजाराम शास्त्री भागवत ह्मणतात ;-" विठ्ठलाची मूर्ति मूळची जैनाची असो किंवा दुसऱ्या कोणाची असो ; पण ती पुंडलिकानें कृष्णाची अर्थात् विष्णूची केली.... पुंडलिकाच्या पाठीं विठोबा व कृष्ण हे दोनही शब्द पर्याय बनले व पंढरपूर एक क्षेत्र झालें. विठोबाचे भक्त व इतर वैष्णव या दोहोंमध्ये मोठा भेद हा कीं, विठोबाचे भक्त शंकराचार्यांच्या अद्वैत सिद्धांतास फार मानून, ज्ञानाचा मार्ग अतिशय आयासविणारा म्हणून सरळ भक्तिमार्गाचें अवलंबन करतात ; व खरे वैष्णव....सर्व द्वैतवादी व शंकराचार्यांस मनःपूत गालिप्रदान करणारे. अद्वैत सिद्धांत व भक्तिमार्ग या दोन मार्गास बेमालूम शिवून टाकण्याचें श्रेय भागवतकारांस दिलें

[library stamp]

पाहिजे........विठोबाच्या भक्तांमध्यें जसे ज्ञानेश्वरासारखे महा-पंडित ब्राह्मण झाले, तसे चोखामेळ्यासारखे अक्षरशत्रु अति-शूद्रही झाले. सूक्ष्म रीतीनें विचार केला असतां, जितके ह्मणून महाराष्ट्र देशांत आजपर्यंत संत होऊन गेले ते जात्या ब्राह्मण असले तरी नामधारी ब्राह्मणी धर्माची हेळणा करणारे व अस्सल ब्राह्मणी धर्माचा पुरस्कार करणारे झाले; त्यामुळें दुरभिमानी ब्राह्मणांच्या ह्मणण्याकडेस मुळींच लक्ष न पोहोंच-वितां आपल्या अजरामर कीर्तीचा झेंडा सर्व महाराष्ट्राभर रोवून, शास्त्र्यांस व महापंडितांस न जुमानतां संस्कृतांतील सर्व भांडार त्यांनीं मऱ्हाठींत ओतून ठेविलें."

## मराठ्यांचे तीन कुलस्वामी.

मराठ्यांचे कुलस्वामी मुख्य तीन आहेत. जोतीबा, खंडोबा व तुळजा भवानी. भैरव, हनुमान वगैरे देव व चौंडे-श्वरी वगैरे देवी काही काही कुळांत देवते आहेत; पण ही सर्व शिव व भवानी यांचे अवतार होत.

## जोतीबा.

जोतीबाचे मुख्य स्थान कोल्हापूरपासून ८ मैलावर वाडी रत्नागिरीच्या डोंगरावर आहे. तेथे चैत्र शुद्ध पौर्णिमेस मोठी यात्रा भरते व भक्त देवाच्या नावाने "चांग भला" असा घोष करतात. केदारविजय नामक ग्रंथांत जोतीबाविषयी पुष्कळ मजकूर आहे. पण त्यास काही आधार नाही; सर्व काल्पनिक आहे. या देवाविषयी विचार अन्य विश्वसनीय पुराव्याने अनुमानाच्या जोरावरच करावा लागेल. जोतीबा

किंवा जोतबा यांत मुख्य भाग जोत हा आहे. मराठ्यांतील पुष्कळ कुळांचा जोत हा कुळदेव आहे. त्यांतील शिंदे व चव्हाण ही घराणी प्रमुख आहेत.

शिंदे हे उपनाव, कुळस्वामी जोत व त्यांचे देवक समुद्रवेल या तिहींचा विचार एकत्र करणे योग्य आहे.

शिंदे हे नाव दहाव्या शतकांत शिलालेखांत दिसू लागले आणि त्या वेळच्या भाटांनी त्या नांवाचा संबध सिंधु नदीशी लावला. तो कऱ्हाडच्या शिंद्याच्या कोरींव लेखांत दिलेला आहे. शिंदे हे नांव सिंध प्रांतावरून पडले असा भाटांचा संप्रदाय आहे. त्यांचा कुळदेव जोत आहे. आजही सिंध प्रांतातील प्राचीन देवस्थाने जोतच आहेत. येथील जोतीबाच्या यात्रेत " चांगभला " असा घोष करतात. सिंधमध्ये " चंगाभला " हा शब्द " कसे काय, ? " " बरे आहे ना ? " या अर्थी योजतात. दोन सिंधी माणसे कोणत्याही जातीची व धर्माची असोत, " चंगाभला " " चंगाभला " ह्मणून एकमेकास अभिवादन करतात. यावरून भाटांचा जो सांप्रदायिक समज आहे त्यास बळकटी येते. देवक समुद्रवेल आहे. ही वनस्पति नावाप्रमाणे समुद्राच्या भरतीच्या पाण्याची हद्द दाखविते. शिंद्यांनी महाराष्ट्रांत आल्यावर इतर मराठ्यांप्रमाणे देवक घेतले, ते त्यांचा ज्या वनस्पतीशी प्रथम योग आला तिचे पान घेतले. यावरून शिंदे हे जलमार्गाने रत्नागिरीच्या बंदराजवळ उतरले असावे. आतांचा जोतीबाचा डोंगर रत्नागिरी बंदराच्या थेट पूर्वेस गाडीरस्त्याने सुमारे ७०

७'५ मैल आहे. पायरस्त्याने यापेक्षांही कमी पडेल. या डोंगरास त्यानी ' रत्नागिरी ' असे पूर्वपरिचित नाव दिले. कऱ्हाड प्रांतात त्यानी राज्य केले. कऱ्हाड या डोंगरापासून फार दूर नाही.

सिंधी भाषा व मराठी भाषा यांमध्ये पुष्कळच साम्य आहे व नजीकचा संबंध आहे. विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ह्मणजे " आहे " या मराठी शब्दाचे रूप गुजराती, हिंदी वगैरे भाषांत निरनिराळे होते, पण सिंधीत ते " आहे " असेच आहे.

सिंध प्रांतांत प्राचीन देवस्थाने जोतची आहेत असे वर सांगितले आहे. तेथे मूर्ति नसते. एक दिवा अहोरात्र जळत असतो ; तिची जोत हेच मुख्य दैवत. कोल्हापूर प्रांती अशी देवस्थाने होती. त्यांतील एक रामलिंगाच्या डोंगरावरील आह्मी स्वतः पाहिले आहे. तेथे दिवा तेवढा असे. कोणत्याही दिशेचा वारा वाहो, ज्योतीस तो लागू नये अशी व्यवस्था होती. अलीकडे १०।१२ वर्षांपासून तो दिवा पेटवीत नाहीत असे ऐकतो. सिंधमध्येही बहुतेक प्रत्येक महत्वाच्या हिंदु वस्तीच्या गावी जोतचे देऊळ असते व एक दीप अखंड जळत असतो. गावची हिंदु पंचायत ( हाही सिंधी शब्द आहे ) या दीपाच्या तेलाची व त्यावर लक्ष ठेवणाराची तजवीज करतात.

फार प्राचीन कालापासून रूढ झालेले हे दैवत सिंधकडून आलेल्यानी आपल्याबरोबर आणले. या लोकांना सदर प्रांतावरून सिंदे असे नाव पडणे साहजिक आहे. आजही

शिंदे वंशाचा कुलस्वामी जोतीबाच आहे. ग्वाल्हेरकर वाडी-रत्नागिरीस दरसाल मोठा खर्च करितात व त्यांनी ग्वाल्हेरीस एक मोठे देऊळही बांधिले आहे.

या देवास ज्योतिर्लिंग असेही ह्मणतात. या सामासिक शद्बाचा विग्रह, ज्योति आहे लिंग ह्मणजे रूप जिचे ती देवता.

आज जी ज्योतिर्लिंगे ह्मणून शंकराची प्रसिद्ध स्थाने आहेत त्या ठिकाणी पूर्वी ज्योतिच असावी व लिंगायतांच्या मताचा प्रसार झाल्यावर लिंगस्थापना होऊन ज्योति हा नंदादीप झाला, असे दिसते.

आजरोजीं जोतिबाच्या देवळांत पुरुषाकृति मूर्ति आहे. ज्योत फक्त देवापुढील नंदादीपात दिसते. कोणत्याही पूजेच्या वेळी दीप पेटवून त्याची पूजा करावी लागते. आपल्याकडे आषाढ व० ३० स दिव्याची आवस म्हणतात व त्या दिवशी स्वतंत्र अशी दीपांची पूजा होते. यावरून पाषाणमूर्तींची पूजा जारी होण्यापूर्वी दीप या रूपात एकाकाळी सार्वत्रिक दैवत होते असे अनुमान होते.

देवस्थानाचे भक्त पुष्कळ असले ह्मणजे उत्पन्न पुष्कळ होते आणि पुजाऱ्यांची संख्याही वाढते. नुसता दीप हा निराकार देव आहे. भक्तांकडून फार तर तेलवात किंवा तूप याचा पुरवठा होईल. मूर्ति ज्या देवस्थानात असतात तेथील पुजाऱ्यांची चंगळ असते. नैवेद्य, कापडचोपड, पूजाद्रव्य, दक्षिणा वगैरे देणग्याही मिळतात. मूर्तिपूजा सर्वत्र जारी झाल्यावर या ज्योतींच्या पुजाऱ्यानीही आपल्या फायद्याकरिता

मूर्ति बसवून एक पुराणही रचले, व मुख्य देवतेस नंदादीप-रूपाने कायम ठेवले ; पण खालची पायरी दिली. परंतु दीप-पूजेची छाप लोकांच्या मनावरील पूर्णपणें गेलेली नाही. मूर्तिपूजेच्या अंगभूत अशी दीपपूजा राहिलीच. शिवाय वर्षां-तील एक दिवस त्या पूजेसाठीं राखून ठेवण्यांत आला.

चवाणांचे कुलदैवत ज्वालामुखी किंवा ज्योतिर्लिंग आहे. कोल्हापूर प्रांती चवाणांचे कुलदैवत ज्योतिर्लिंग ऊर्फ जोतीबा आहे. चवाण हे उत्तरेकडे हिमालयाच्या पायथ्याशी राहात होते ; तेव्हां त्यांचे कुलदैवत ज्वालामुखी होते. हे देवस्थान कांगडा खोऱ्यांत आहे. तेथे डोंगरांतून एक प्रकारचा ग्यास निघतो. ती ज्वाला सतत पेटती आहे. हिमालयाकडून खाली येताना कुलदैवत बरोबर पाहिजे ह्मणून ज्वालामुखीचा प्रतिनिधि ज्योत–दीप या रूपाने त्यानी बरोबर बाळगला आहे.

भाटांच्या ग्रंथात चवाणांचे अग्निकुल ह्मटले आहे. रा. रा. चिंतामणराव वैद्य यानीं अग्निकुलकल्पना कशी खोटी आहे हे दाखविले आहे. कुलदैवत ज्योति अग्निरूप असल्याने अग्नि-कुळाची कल्पना सुचली असेल. ज्योत हा आर्यांचा देव. त्याचे मूळस्थान हिमालयांतील ज्वालामुखी. तिचा प्रतिनिधि ह्मणून दीपज्योत प्रथम सिंधप्रांतात व तेथून सिंधच्या लोकां-बरोबर महाराष्ट्रांत आली. प्रथम याची स्थापना दीपस्वरू-पांतच होती. पुढे मूर्तिपूजेस जोर आल्यावर मूर्ति बसविण्यांत आली व मूळचा देव जो ज्योत त्यास नंदादीपाचे गौण स्थान आले. पेशव्यानी छत्रपतीस तेजोहीन करून त्यांची सत्ता

बळकावली. त्याचप्रमाणें मूर्तीने ज्योतीची जागा पटकावून तिला केवळ सेवकाचे स्थान दिले.

## जेजुरीचा खंडोबा.

दुसरा देव खंडोबा. महाराष्ट्रांत याचे मुख्य स्थान जेजुरी आहे. खंडोबाची देवळे इतर बऱ्याच ठिकाणी आहेत. केदार-माहात्म्याप्रमाणेच जेजुरी-माहात्म्यही आहे; पण हे दोन्ही ग्रंथ निरुपयोगी आहेत. दोघांतही तेथील देव शंकराचा अवतार आहे, दोघानाही राक्षसाशी झुंजावे लागत आहे वगैरे कथाभाग अगदीच मामुली आहे. या कथेत सुसंगतताही नाही आणि उच्च दर्जाची कल्पनाही नाही. भाविकाना या ग्रंथांचे महत्व वाटो; पण विचार करणारास त्यांच्याकडून मदत होत नाही.

द्रविडांत सुब्रह्मण्य म्हणून मोठी महत्वाची देवता आहे. या देवाची मोठी देवळे ठिकठिकाणी आहेत. त्यांत मदुरा येथील देऊळ फार प्रसिद्ध आहे. शंकराचा औरस पुत्र स्कंद याचेच नांव सुब्रह्मण्य. स्कंद प्रथम ब्रम्हचारी व नंतर गृहस्थाश्रमी होता. या दोन्ही आश्रमी मूर्ति देवालयांत पूजिल्या जातात. महाराष्ट्रांत ब्रम्हचारी स्कंद किंवा कार्तिकस्वामी याची देवळें क्वचित आहेत. पुण्यास पर्वतीवर एक आहे आणि कर्नाटकांत सोंडूर संस्थानांतील स्थान विशेष प्रख्यात आहे. या ठिकाणी कार्तिकेयाच्या दर्शनास बायका जात नाहीत. गेल्यास सात जन्म वैधव्य येईल, असा शाप आहे. मद्रासेत इतर ठिकाणी गृहस्थाश्रमी सुब्रम्हण्याची देवळे आहेत. तेथे

दर्शनास बायकांची गर्दी असते. या देवाच्या दोन बायका आहेत. त्यांतील एक धनगराची आहे. या देवळांत देवदासी कामास असतात. या देवदासी उघड उघड वेश्याव्यवसाय करणाऱ्या आहेत.

खंडोबाच्या देवळात अशाच मुरळ्या असतात. त्याही उघड उघड वेश्याव्यवसाय करतात. खंडोबासही दोन बायका आहेत. पैकीं एक धनगराचीच आहे. याप्रमाणे आमच्या खंडोबात व मद्रासच्या सुब्रह्मण्यात पुष्कळच साम्य आहे. खंडोबाची तळी उचलतांना यळकोट असे ह्मणतात. हा शब्द द्रविडी आहे. द्रविडांचा हा देव मराठ्यांनीं उचलला असें दिसतें.

खंडोबा या नांवाचा जास्त विचार केल्यास हे दोन देव एकच अशी खात्री पटते. सुब्रह्मण्य हाच कार्तिकेय, हाच स्कंद. सकार गळून कंदस्वामी असे नांव तिकडे आढळते. कंद व खंड यांत फारसा फरक नाहीं. सुब्रह्मण्य हेही नांव मराठ्यांस अपरिचित नाही. सुभानराव, सुबराव, सुब्बाराव, सुबाजी, साबाजी हे शब्द सुब्रह्मण्य शब्दाचे अपभ्रंश आहेत. सुब्रह्मण्य किंवा स्कंद हा देवांचा सेनापति ह्मणजे युद्धदेव. तो मराठ्यांसारख्या योद्धयांस पसंत पडावा हे योग्यच आहे.

## आई भवानी.

तिसरे कुलदैवत भवानी हे आहे. स्थानपरत्वे हिला अनेक नावे आहेत. जैन, ब्राह्मण किंवा लिंगायत यांच्या

ताब्यांत ही देवता न गेल्याने हिला मद्य-मांस यांचा नैवेद्य व कोंबडा, बकरा व रेडा असे बळी अद्यापही चालतात व मिळतात.

मराठ्यांच्या या कुलदैवतांपैकीं एक निःसंशय द्रविडांचे, एक निःसंशय उत्तरेकडील आर्यांचे असे आहे. ह्मणजे या मिश्र समाजांत दोन्ही वंशांच्या देवतांना सारखाच थोरपणा आलेला आहे.

महाराष्ट्रांतील ब्राह्मणादि इतर जातीं यांचेही कुलस्वामी हेच देव आहेत. या कामी मराठे व मराठेतर यांच्यात भेद नाहीं.

## मराठ्यांचे देवक.

लग्नकार्याच्या प्रसंगी मंडपप्रतिष्ठा व कुलदेवता प्रतिष्ठा ब्राह्मणादि जातींत होते तशीच मराठ्यांतही होते. पण याखेरीज त्याच वेळीं देवकस्थापनाही होते. निरानिराळ्या कुळाचे निरनिराळे देवक असते. उदाहरणार्थ, चव्हाणवंशाचे वासनवेल; मोरे यांचे मोराचे पंख व वेत; पवार यांचे पांच पल्लव ( आंबा, जांभळ, उंबर, शमी, रुचीक, ); राष्ट्रकूटांचा शंख: जाधव यांचे काटोट; कदम व निकम यांचें शंख. कदंब, धीटक यांचे शंख इत्यादि देवके आहेत. एकच देवक ज्यांचे आहे अशा कुलांत शरीरसंबंध होऊ नये असा निर्बंध आहे.

आर्यांत देवक नाही. द्रविडांतील कांहीं लोकांत आहे. मराठ्यांना हे द्रविडांपासून घ्यावे लागले. द्रविडांतील खालच्या जाती व खोंड वगैरे असंस्कृत लोक यांच्यांत देवकाचा प्रचार

जारी आहे. देवकास इंग्रजींत Totem ह्मणतात. निरानिराळ्या टोळ्या मिळून एक वंश बनतो. प्रत्येक टोळी एखाद्या वनस्पतीशी, प्राण्याशी, किंवा निर्जीव वस्तूशी संबद्ध झालेली असते. अशी संबद्ध टोळी हे एक कुटुंब मानले जाते; ह्मणून तीतील मनुष्यांत परस्परांत शरीरसंबंध होत नाही. अशी जात टॉटेमिक ह्मणजे देवक पाळणारी आहे असे ह्मणतात.

मूळपासूनचा ब्राह्मणी धर्मानुयायीसमाज व पूर्णपणे ब्राह्मणधर्मानुयायी झालेला द्रविडसमाज हे आपल्या कुटुंबास कोणत्या तरी एका गोत्राचे ह्मणवितात. बाकीचे लोक आपण अमुक देवकाचे असे सांगतात. गोत्र व देवक कल्पना मूळची एकच दिसते. उत्क्रांतितत्त्वाप्रमाणे देवकाचे रूपांतर गोत्रात झाले असावे.

सूर्यवंश, चंद्रवंश, शेषवंश, अग्निवंश वगैरेच्या पौराणिक आख्यायिकांस खरे मानणारे सूर्य, चंद्र, शेष व अग्नियांपासून उत्पत्ति झाली असें खुशाल ह्मणोत. विचारी पुरुषास या गोष्टी पटणाऱ्या नाहीत. जसे प्रत्येक टोळीचे देवक किंवा Totem असते त्याप्रमाणे सबंध वंशाचेही काहीं ध्वजचिन्ह असावे व त्यावरून त्या त्या वंशाचें लोक अशी ओळख पटली असावी, असे अनुमान होते.

## क्षुद्र देवता.

नदी, सरोवरें, पर्वत वगैरेवर अधिष्ठित देवता आहेत त्यांवर व भुतें, पिशाचे यांवर असंस्कृत समाजाचा विश्वास असतो; व या देवतांना भिन्नभिन्न तऱ्हेने ते भजतात. अशा

लोकांना animist ह्मणतात. या लोकांत देवक किंवा Totem यांचा प्रघात जारी असतो. या लोकांची जसजशी सुधारणा होत जाते, तसतसे ते ब्राह्मणी धर्माच्या कक्षेत जास्त जास्त येऊ लागतात. अनिमिस्ट देवांच्या जागी ब्राह्मण देव घुसतात; ह्मणजे त्या जुन्या देवाच्या पूजेत फरक येतो. असे झाले ह्मणजे Totem किंवा देवक बाजूस राहाते व त्या जागी गोत्र येते. या देवकाच्या नांवाला सदृश असे ऋषीचे नांव गोत्रास देतात. कच्छप ह्मणजे कासव हे बंगालमधील पुष्कळच जातींचे देवक होते; पण त्यांनी हे देवक सोडून दिले आहे व ते आपणास कश्यपगोत्री ह्मणवितात. याप्रमाणे देवक जाऊन त्याबद्दल बऱ्याच जातीत गोत्र नांवाचा प्रघात सुरू झालेला आहे.

## सगोत्र विवाह.

दक्षिण हिंदुस्थानांतील बेस्टा या जातीने अशीच गोत्रे उचलली आहेत. ते आता मूळपासून आपण ब्राम्हणी धर्माचेच आहो असे म्हणतात; पण त्यांच्यामध्ये सगोत्र विवाहास प्रतिबंध नसल्याने गोत्रे ही मागाहून चिकटविल्यासारखी स्पष्ट दिसतात. गोत्रांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति केवळ ब्राम्हणेतरातच आहे असे नाही. बऱ्याच ब्राम्हणजातीही गोत्राचा प्रतिबंध झुगारून देणाऱ्या आढळतात. अनाविल ब्राम्हणात सात पिढ्यापलीकडील सगोत्र वधुवरात विवाह होतो. औदिच ब्राम्हणांत आडनावे भिन्न असल्यास सगोत्र विवाह होतो. मोढ ब्राम्हणात प्रवर भिन्न असला म्हणजे गोत्र एक असले तरी विवाह करतात. बहारप्रांतातील शकद्वीपी ब्राम्हण, तसेच

आसाम, गढवाल व मारवाड येथील ब्राम्हणही सगोत्राचा प्रतिबंध न मानणारे आहेत.

## गोत्राची अडचण टाळण्याची प्रवृत्ति.

या ब्राम्हणांना मूळची गोत्रे नव्हती, त्यांनी अलीकडेच गोत्रे घेतली; असे म्हणण्याचा माझा उद्देश नाही. गोत्राची अडचण ही योग्य नाही, ती कशी तरी बाजूस टाकली पाहिजे अशी खात्री पटल्याने या जातींनी काही तरी सबब काढून ती अडचण टाळली आहे. नुकत्या झालेल्या राजवाडे-जोशी विवाहांतही वधूस दत्तक देण्याचा प्रकार केला व गोत्राची हरकत दूर झाली असे मानले; पण हे शास्त्रविरुद्ध झाले. " अनेनैव न्यायेन परगोत्रोत्पन्नदत्तकादीनां इदानींतनानामपि द्विगोत्रत्वात् जनकप्रतिगृहीतृपित्रोर्द्वयोरपि सगोत्रैःसह अविवाहो ज्ञेयः, नात्र पुरुषसंख्या, तेन शतपुरुषोत्तरमपि द्विगोत्रत्वं नापैति ॥ " असे धर्मसिंधूचे वचन आहे. हे केवळ दत्तपुत्राच्या विवाहासच लागू आहे. यांत दत्त मुलीचा उल्लेख नाही अशी तक्रार पुढे येईल तर त्याच ग्रंथात " दत्तकस्य गोत्रसापिंड्यादि निर्णय " प्रकरणांत सांगितले आहे:–" एवं दत्तकन्याया अपि स्वीकारः उक्तविधिना कार्यः तत्र परगोत्रोत्पन्नाया ग्रहणे विवाहे गोत्रद्वयवर्जनं प्राग्वत् । " हा शास्त्रार्थ उभय कुलांतील कर्त्या पुरुषांस किंवा त्यांच्या पुरोहितांस माहीत नव्हता असे म्हणता येत नाही पण गोत्राची अडचण अप्रयोजक आहे; ती तर बाजूस ढकललीच पाहिजे; पण लोकसमजुतीसाठीं काही तरी केले पाहिजे म्हणून मुलगी

लोकांना animist ह्मणतात. या लोकांत देवक किंवा Totem यांचा प्रघात जारी असतो. या लोकांची जसजशी सुधारणा होत जाते, तसतसे ते ब्राह्मणी धर्माच्या कक्षेत जास्त जास्त येऊ लागतात. अनिमिस्ट देवांच्या जागी ब्राह्मण देव घुसतात; ह्मणजे त्या जुन्या देवाच्या पूजेत फरक येतो. असे झाले ह्मणजे Totem किंवा देवक बाजूस राहाते व त्या जागी गोत्र येते. या देवकाच्या नांवाला सदृश असे ऋषीचे नांव गोत्रास देतात. कच्छप ह्मणजे कासव हे बंगालमधील पुष्कळच जातींचे देवक होते; पण त्यांनी हे देवक सोडून दिले आहे व ते आपणास कश्यपगोत्री ह्मणवितात. याप्रमाणे देवक जाऊन त्याबद्दल बऱ्याच जातीत गोत्र नांवाचा प्रघात सुरू झालेला आहे.

## सगोत्र विवाह.

दक्षिण हिंदुस्थानांतील बेस्टा या जातीने अशीच गोत्रे उचलली आहेत. ते आता मूळपासून आपण ब्राम्हणी धर्माचेच आहो असे म्हणतात; पण त्यांच्यामध्ये सगोत्र विवाहास प्रतिबंध नसल्याने गोत्रे ही मागाहून चिकटविल्यासारखी स्पष्ट दिसतात. गोत्रांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति केवळ ब्राम्हणेतरातच आहे असे नाही. बऱ्याच ब्राम्हणजातीही गोत्राचा प्रतिबंध झुगारून देणाऱ्या आढळतात. अनाविल ब्राम्हणात सात पिढ्यापलीकडील सगोत्र वधुवरात विवाह होतो. औदिच ब्राम्हणांत आडनावे भिन्न असल्यास सगोत्र विवाह होतो. मोढ ब्राम्हणात प्रवर भिन्न असला म्हणजे गोत्र एक असले तरी विवाह करतात. बहारप्रांतातील शकद्वीपी ब्राम्हण, तसेच

आसाम, गढवाल व मारवाड येथील ब्राम्हणही सगोत्राचा प्रतिबंध न मानणारे आहेत.

## गोत्राची अडचण टाळण्याची प्रवृत्ति.

या ब्राम्हणांना मूळची गोत्रे नव्हती, त्यानी अलीकडेच गोत्रे घेतली; असे म्हणण्याचा माझा उद्देश नाही. गोत्राची अडचण ही योग्य नाही, ती कशी तरी बाजूस टाकली पाहिजे अशी खात्री पटल्याने या जातीनी काही तरी सबब काढून ती अडचण टाळली आहे. नुकत्या झालेल्या राजवाडे-जोशी विवाहांतही वधूस दत्तक देण्याचा प्रकार केला व गोत्राची हरकत दूर झाली असे मानले; पण हे शास्त्रविरुद्ध झाले. “ अनेनैव न्यायेन परगोत्रोत्पन्नदत्तकादीनां इदानींतनानामपि द्विगोत्रत्वात् जनकप्रतिगृहीतृपित्रोर्द्वयोरपि सगोत्रैःसह अविवाहो ज्ञेयः, नात्र पुरुषसंख्या, तेन शतपुरुषोत्तरमपि द्विगोत्रत्वं नापैति ॥ ” असे धर्मसिंधूचे वचन आहे. हे केवळ दत्तपुत्राच्या विवाहासच लागू आहे. यांत दत्त मुलीचा उल्लेख नाही अशी तक्रार पुढे येईल तर त्याच ग्रंथात “ दत्तकस्य गोत्रसापिंड्यादि निर्णय ” प्रकरणांत सांगितले आहे:-“ एवं दत्तकन्याया अपि स्वीकारः उक्तविधिना कार्यः तत्र परगोत्रोत्पन्नाया ग्रहणे विवाहे गोत्रद्वयवर्जनं प्राग्वत् । ” हा शास्त्रार्थ उभय कुलांतील कर्त्या पुरुषांस किंवा त्यांच्या पुरोहितांस माहीत नव्हता असे म्हणता येत नाही पण गोत्राची अडचण अप्रयोजक आहे; ती तर बाजूस टाकलीच पाहिजे; पण लोकसमजुतीसाठीं काही तरी केले पाहिजे म्हणून मुलगी

परगोत्रांत दत्तक दिल्याने सगोत्राची अडचण दूर झाली असे समाधान करण्यात आले इतकेच झाले आहे. वास्तविक पाहता ते लग्न सगोत्रातच झाले आहे. पण हा प्रतिबंध सात पिढ्यांच्या पलीकडे पाळण्याचे कारण नाही असा अनाविलांनी आचार पाडला आहे तो पुष्कळच समंजसपणाचा आहे. हा आचार व ही समजूत इतर ब्राम्हणानीही स्वीकारावी असा हा काल आहे.

क्षत्रिय-वैश्यासाठीं सगोत्राची अडचण टाळण्यास विज्ञानेश्वरानी मिताक्षरेत साधा, सोपा, बिनखर्ची उपाय सांगितला आहे. त्यानी सांगितल्याने तो आता शास्त्रविहित झाला आहे. सध्याच्या काळी सगोत्राची अडचण आल्यास मुलीच्या बापाचा उपाध्याय मुलगी दत्तक देण्याचा उपाय सुचवितो. त्यास खरा मार्ग उपाध्याय बदलण्याचा माहीत नसतो असे नाहीं. पण तो सांगितल्यास त्याचे स्वताचेच नुकसान असते. म्हणून काही तरी उपाय व तोही दक्षिणेच्या रूपाने फायदेशीर असा, मुलगी दत्तक देण्याचा अशास्त्र आहे तरी, तो सुचावितो व तो वधूपिता अवलंबितो. ज्या क्षत्रिय-वैश्यास सगोत्र विवाहाची खरोखरीच भीति वाटत असेल व त्यांतून सशास्त्र मार्गाने सगोत्राची अडचण दूर करावयाची इच्छा असेल, त्यानी आपला उपाध्याय आपल्याच गोत्राचा असल्यास तो बदलून ती अडचण काढून टाकावी.

## देवक मराठ्यांत घुसले.

देवकाची चाल आर्यामध्ये नाही. मराठे आर्यांनी द्रविडांच्या मुली आपल्या बायका केल्या तेव्हां ती स्वीकारली

असावी असे अनुमान होते. या काळी किंवा नंतर केवळ द्रविडांच्याच मुली त्यांनी आपल्या समाजांत घेतल्या असे ह्मणता येत नाहीं. ज्या ज्या द्रविड घराण्यांतून मुली घेतल्या त्या त्या घराण्यांत मुली देऊन हा संबंध दृढ झाला असलाच पाहिजे; ह्मणजे पर्यायाने त्यांना मराठे करून घेण्यांत आले. मराठा ही जात मोठीच संग्राहक आहे. यानंतर आर्यांपैकीं किंवा दुसरी जी घराणी इकडे आली त्यांना मराठ्यानी आनंदाने स्वीकारिले आहे. उदाहरणार्थ, शिंदे घराण्याची गोष्ट घ्या. नुकतेच सांगिल्याप्रमाणे हे घराणे सिंधकडून आलेले. त्याना मराठ्यांत घेतलेच ; पण त्यांचा देवही स्वीकारिला. गुजर हेही तसेच मागून आलेले. त्यांनाही घेतले. भोसले घराणे उदेपुराहून आलेले. त्यांचाही समावेश मराठ्यांत होण्यास अडचण पडली नसावी. पेशा काय? असा प्रश्न. तो आपल्यासारखाच लढाऊ आहे. ठीक ; मग ते आमचेच, अशा बुद्धीने स्वीकार झालेला आहे. पण अट ही की, त्यानी मराठ्यांचे आचारविचार पाळून अगदी एकरूप झाले पाहिजे., उदेपुरास देवक नाही व मंगळसूत्रही नाही. पण भोसल्यास दोनीही स्वीकारावीं लागलीं. तिकडील उपाध्यायाचे लोढणे बरोबर न आणता जरूरीप्रमाणे इकडील उपाध्याय घेतल्यामुळे ही आचारविचारपालनाची भानगड विशेष जाणवली नसेल.

## देवस्की.

बुद्ध व जैन धर्माचा पगडा मराठ्यांच्या पुष्कळ घराण्यावर बरेच दिवस होता. पुढे ब्राह्मणानी बुद्धजिनांची अहिंसेची मते स्वीकारून आपला धर्म जास्त ग्राह्य केला. तेव्हा

मराठे हे वैदिक धर्मात पुन्हा आले. या धर्माप्रमाणे देवकपालन योग्य नाही. पण देवकाचा निषेधही नाही. ह्मणून उपाध्यायांनी त्यास हात लावला नाही. त्याच प्रमाणे देवस्की या नावाखाली क्षुद्र देवतांची उपासना जैनांच्या वेळीच सुरू झाली होती. ब्राह्मणांनी ती त्यांच्यापासून घेतली व बहुजन समाजावर आपले वजन राहाण्यासाठी ते प्रकार जारी ठेवले. जैनांच्या वेळी या देवस्कीतून हिंसा गेली असावी. पण मराठ्यांत ती पूर्वीपासून असल्याने ब्राह्मणांनी तिचा निषेध न करितां तिला उत्तेजनच दिले. हे देवस्कीचे प्रकार animism च्या वेळचे दिसतात. हे प्रकार अद्यापही तमाम खेड्यांतून व शहरांतूनही चालू असतात. हे वेदविहित नाहीत तरी यांस हरकत घेतली जात नाही देवाच्या बाबतीत ब्राह्मण उपाध्याय हाही मोठा संग्राहक आहे. कोणतेही स्थानिक दैवत घ्या. ते शिव, विष्णु, दुर्गा वगैरे पैकी कोणाचा तरी अवतार आहे असे तो ठरवून देईल. जरूर लागल्यास त्याकरिता एकादे पुराण रचील. आपल्या यजमानाकरिता सूर्य, चंद्र, अग्नि, नाग वगैरे वंश निवडून काढून अगदी सूर्यचंद्रापासून पुराणांतल्या वंशावळीचा दाखला देईल. या देवतांची—मग ती कितीही क्षुद्र असोत—पूजा करण्यास तो तयार आहे. मुसलमान लोक पिराची व ख्रिस्ती लोक क्रूसाची गंधपुष्पानी पूजा करू देतील तर हा यजमानाबरोबर जाऊन पूजा सांगण्यास माघार घेणार नाही.

खरा धर्म कोणता, सदाचार काय आहे, याचा विचार करून आपल्या संस्कारांतील व धर्माचरणांतील निरर्थक भाग गाळण्यावर आता मराठासमाजाने जोर दिला पाहिजे. देवके

व देवस्की ही निरुपयोगी असल्याने ती प्रथम टाकण्यास हरकत नाही.

## उत्तर व दक्षिण हिंदुस्थानी आर्यस्त्रिया.

चंद्रवंशी आर्यांची दुसरी टोळी मध्यदेशांत आली. तिच्याबरोबर बायका भरपूर नसल्यामुळे आर्यांनी द्रविड स्त्रियांबरोबर विवाह केले; वगैरेचा उल्लेख वर आलाच आहे. आर्य हे जेते व द्रविड हे जित असे नाते मध्यदेशांत असल्याने आर्यांच्या चालीरीती द्रविड स्त्रियांवर लादण्यांत आल्या. मरहट्टे ह्मणजे आर्य यानी मोठ्या प्रयासाने विंध्य ओलांडून दक्षिणेत आक्रमण केले; ते लढाऊ शिपायांनीच केले असावे. कारण या वेळी बायकापोरांचे लचांड बाळगणे ह्मणजे अपयश पदरी घेण्यासारखे आहे. या कारणाने मराठ्याना बायका बहुतांशी द्रविडांच्याच कराव्या लागल्या. आपल्या समान दर्जाच्या ह्मणजे द्रविडांतील लढवय्यांच्याच मुली त्यानी घेणे स्वाभावीक आहे. यामुळे या बायकांचे वजन आर्यमराठे पुरुषांवर चांगलेच राहिले. द्रविड बायकानी माहेरच्या चालीरीतीस चांगलाच आश्रय दिला व आर्यांच्या चाली फारच थोड्या घेतल्या.

## चालींत फरक.

या कारणानें उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान यांतील आर्यांच्या स्त्रियांच्या चालीरीतीत फरक पडत गेला आहे. उत्तर हिंदुस्थानांतील आर्यांबरोबर काही आर्यस्त्रिया होत्या. त्यांच्या चालीरीतीप्रमाणे द्रविड बायकानीही वागले

मराठे हे वैदिक धर्मात पुन्हा आले. या धर्माप्रमाणे देवकपालन योग्य नाही. पण देवकाचा निषेधही नाही. ह्मणून उपाध्यायानी त्यास हात लावला नाही. त्याच प्रमाणे देवस्की या नावाखाली क्षुद्र देवतांची उपासना जैनांच्या वेळीच सुरू झाली होती. ब्राह्मणांनी ती त्यांच्यापासून घेतली व बहुजन समाजावर आपले वजन राहाण्यासाठी ते प्रकार जारी ठेवले. जैनांच्या वेळी या देवस्कीतून हिंसा गेली असावी. पण मराठ्यांत ती पूर्वीपासून असल्याने ब्राह्मणांनी तिचा निषेध न करितां तिला उत्तेजनच दिले. हे देवस्कांचे प्रकार animism च्या वेळचे दिसतात. हे प्रकार अद्यापही तमाम खेड्यांतून व शहरांतूनही चालू असतात. हे वेदविहित नाहीत तरी यांस हरकत घेतली जात नाही देवाच्या बाबतीत ब्राह्मण उपाध्याय हाही मोठा संग्राहक आहे. कोणतेही स्थानिक दैवत घ्या. ते शिव, विष्णु, दुर्गा वगैरे पैकी कोणाचा तरी अवतार आहे असे तो ठरवून देईल. जरूर लागल्यास त्याकरिता एकादे पुराण रचील. आपल्या यजमानाकरिता सूर्य, चंद्र, अग्नि, नाग वगैरे वंश निवडून काढून अगदी सूर्यचंद्रापासून पुराणांतल्या वंशावळीचा दाखला देईल. या देवतांची—मग ती कितीही क्षुद्र असोत—पूजा करण्यास तो तयार आहे. मुसलमान लोक पिराची व ख्रिस्ती लोक क्रूसाची गंधपुष्पानी पूजा करू देतील तर हा यजमानाबरोबर जाऊन पूजा सांगण्यास माघार घेणार नाही.

खरा धर्म कोणता, सदाचार काय आहे, याचा विचार करून आपल्या संस्कारांतील व धर्माचरणांतील निरर्थक भाग गाळण्यावर आता मराठासमाजाने जोर दिला पाहिजे. देवके

व देवस्की ही निरुपयोगी असल्याने ती प्रथम टाकण्यास हरकत नाही.

## उत्तर व दक्षिण हिंदुस्थानी आर्यस्त्रिया.

चंद्रवंशी आर्यांची दुसरी टोळी मध्यदेशांत आली. तिच्याबरोबर बायका भरपूर नसल्यामुळे आर्यानी द्रविड स्त्रियांबरोबर विवाह केले; वगैरेचा उल्लेख वर आलाच आहे. आर्य हे जेते व द्रविड हे जित असे नाते मध्यदेशांत असल्याने आर्यांच्या चालीरीती द्रविड स्त्रियांवर लादण्यांत आल्या. मरहट्टे ह्मणजे आर्य यानी मोठ्या प्रयासाने विंध्य ओलांडून दक्षिणेत आक्रमण केले; ते लढाऊ शिपायांनीच केले असावे. कारण या वेळी बायकापोरांचे लचांड बाळगणे ह्मणजे अपयश पदरी घेण्यासारखे आहे. या कारणाने मराठ्याना बायका बहुतांशी द्रविडांच्याच कराव्या लागल्या. आपल्या समान दर्जाच्या ह्मणजे द्रविडांतील लढवय्यांच्याच मुली त्यानी घेणे स्वाभावीक आहे. यामुळे या बायकांचे वजन आर्यमराठे पुरुषांवर चांगलेच राहिले. द्रविड बायकानी माहेरच्या चालीरीतीस चांगलाच आश्रय दिला व आर्यांच्या चाली फारच थोड्या घेतल्या.

## चालींत फरक.

या कारणानें उत्तर हिंदुस्थान व दक्षिण हिंदुस्थान यातील आर्यांच्या स्त्रियांच्या चालीरीतीत फरक पडत गेला आहे. उत्तर हिंदुस्थानांतील आर्यांबरोबर काही आर्यस्त्रिया होत्या. त्यांच्या चालीरीतीप्रमाणे द्रविड बायकानीही वागले

पाहिजे अशी शिस्त उत्तरेकडे ठेवण्यात आली. या उलट प्रकार दक्षिणेत घडला. आर्य स्त्रिया मरहट्टे आर्यांबरोबर विशेष आल्या नसाव्यात. ह्मणून दक्षिणेतील द्रविडांच्या मुलीबरोबर विवाह केल्यावर त्या साहजिकच आपल्या माहेरच्या चाली धरून बसल्या; पण आर्यपुरुषांमध्ये आर्यांचीच चालरीत राहिली. विवाहाच्या वेळीं मराठा वर घोड्यावर बसून वधूगृही जातो तेव्हा तो पूर्ण पोषाखांत सशस्त्र असतो; ह्मणजे एखाद्या वीराप्रमाणे वधू जिंकण्यास तो जात असतो. हे आर्य संप्रदायास अनुसरून आहे पण रजपुतासारखी लटकी लढाई व वधू पित्याच्या दारावरील तोरण तोडणे हीं कृत्ये मराठ्यांच्या आचारांतून सध्या गेली आहेत.

उत्तरेकडील रजपुत एका ताटांत जेवणारे आहेत. मराठ्यांच्या भाषेंत ‘ एका ताटाचे ’ हा शब्द राहिलेला आहे. कुलसंबंधाने संशय पडतो तेव्हा त्याचा निर्णय एका ताटात जेवूनच करण्याची रीत अद्यापि आहे. पण द्रविडांचे अनुकरण करून मराठ्यांनी एक ताटांत जेवण्याच्या आपल्या पूर्वीच्या चालीस सोडले आहे.

दक्षिणेतील मराठा आर्यांच्या बायकांना काही आर्यांच्या चाली स्वीकाराव्या लागल्याच; पण त्यांस त्यांनीं गौण स्थान दिले व द्रविडचालीस प्राधान्य ठेविले.

## सौभाग्यालंकार.

काही दागिने वगैरेवरून स्त्री विवाहित किंवा कुवार आहे हे कळते. हे अलंकार लग्नाच्यापूर्वी वापरीत नाहीत.

लग्नाच्या वेळींच तो देण्यांत येतो. विधवा झाल्यास तो काढून टाकावा लागतो. अशा अलंकारास सौभाग्यालंकार ह्मणतात. उत्तर हिंदुस्थानातील आर्यांत हस्तिदंती चूडा हा सौभाग्यालंकार आहे. तो चूडा जिच्या हातीं आहे. तिचा नवरा हयात आहे असे बिनदिक्कत समजावे. जुन्या घराण्यांत हा सर्व हातभर व कधी कधी कोपराच्यावरही आढळतो. अलीकडे यांची संख्या कमी होत चालली आहे. बंगाल्यात शंखाच्या बांगड्या भरण्याची चाल पडली आहे. पण तेथे लग्नाचा चूडा लोखंडी बांगडी असते व तिचीं दोन्ही तोंडे पूर्णपणे मिळविलेलीं असतात. तिच्यावर शोभेसाठी सोन्याचे कामही करण्यात येते. वैधव्य आल्यास हा चूडा हत्याराने तोडावा लागतो. सहज निघत नाहीं. हा खराच वज्रचूडा. गुजरात, मारवाड, संयुक्त प्रांत, बंगाल, आसाम, बहार वगैरे सर्व प्रांतांत चूडा हाच सौभाग्यालंकार आहे. मराठ्यांच्या भाषेत सुवासिनीला वज्रचूडेमंडित ह्मणतात. नवऱ्याचा जीव वाचवा अशी विनवणी करतांना मराठ्याची बायको ' मला चुडेदान द्या ' असे ह्मणेल. आर्य संप्रदायाप्रमाणें चूड्यास महत्त्व आर्य भाषेतच राहिले ; पण आचारांत प्रकार निराळाच आहे. नवरी मुलगी लग्नास उभी करताना हिरव्या बांगड्याचा लग्नचूडा भरण्यात येतो. पण तो टिकाऊ नसतो. तो कांचेचा असतो व थोड्याच दिवसात त्याच्या जागी दुसऱ्या बांगड्या येतात. द्राविडांच्या संप्रदायात चूड्याला महत्त्व नाही. आर्यांच्या द्रविड बायकांनी आर्य चालीचा मान राखण्यासाठी लग्नचुडा घेतला,

पण त्याला महत्त्व विशेष ठेविले नाही. कुमारीही बांगड्या हातात भरते व विधवा स्त्रीही हात मुंडा ठेवतेच असेही नाही.

## मंगळसूत्र.

द्रविडांमध्यें मुख्य सौभाग्यालंकार ताली ह्मणजे मंगळसूत्र हा आहे. कुमारी मंगळसूत्र बांधीत नाही. लग्नाच्या वेळी वर वधूच्या गळयांत मंगळसूत्र बांधतो. मराठ्यांच्या बायकांनी या मंगळसूत्रालाच प्राधान्य देऊन द्रविडांची ही चाल मराठा आर्यांकडून स्वीकारविली आहे. यावरून मराठ्यांमध्ये बायकांस किती महत्त्व आहे हे दिसते.

## कुंकू.

कपाळावर कुंकू लावणे ही मूळची द्रविडांची चाल आहे. हळद चोपडण्याचीही चाल तिकडचीच. बायका केसास हळद लावीत व ती वाळल्यावर फणीने हळदीचे कण काढून टाकीत, असा उल्लेख सप्तशतीत आहे.

हळदकुंकवास कोणी कोणी सौभाग्यालंकार समजतात. पण हळदकुंकु कुमारीही लावतात. विधवा लावीत नाहीत. कारण विधवांस शिणगार शोभत नाही. शिवाय सर्वच सवाष्णी कुंकू नेहमीच लावतात असेही नाही. बाळंतपणात किंवा ऋतुकाली बहुधा कुंकू न लावण्याची चाल आहे. त्याचप्रमाणे अशिक्षित शेतकऱ्यांच्या बायका सणावारी किंवा लग्नकार्यात मात्र कुंकू लावतात. इतर वेळी कुंकू लावतातच असे नाही. यावरून कुंकू हे खरे सौभाग्यचिन्ह नव्हे असे होते.

## भांगात शेंदूर.

आर्य स्त्रियांतील सुवासिनी आपल्या भांगात शेंदूर किंवा कुंकू भरतात. हे खरे सौभाग्य चिन्ह आहे. ही चाल द्रविडांत नाही. कांही मराठ्यांच्या बायका भांगात थोडेसे कुंकू टाकतात. समिन्तोन्नयन हा संस्कार केल्यास भांगात शेंदूर भरावा लागतो.

## पदर डोकीवर.

आर्यस्त्रिया या नेहमी डोकीवर पदर घेणाऱ्या आहेत. मारवाडी स्त्रिया झगा घालतात; पण पदराकरिता दुसरे वस्त्र घेतातच. द्रविड स्त्रिया या पदर घेत नाहीत, डोके उघडे ठेवतात. यासाठी आर्यसंस्कृतीप्रमाणे पदर आवश्यक असल्याने वधूच्या डोकीवर पदर घालण्याचा एक समारंभ करावा लागतो. मराठ्यांमध्ये हा समारंभ करावा लागत नाही. कारण कुंवार मुली परकर नेसण्याच्या पलीकडे गेल्या ह्मणजे लुगडे नेसताना डोकीवर पदर घेतातच. मराठ्यांच्या द्रविडी बायकानी ही आर्यांची पदर घेण्याची चाल उचलली आहे. काही घराण्यांत लग्नाच्या येळी पदर घालण्याचा विधि करण्याचा संप्रदायही आहे. पदर घेण्याची चाल मराठे आर्यांनी आपल्या बायकांवर लादली आहे.

अपकीर्ति झालेल्या स्त्रीविषयीं बोलण्याचे झाल्यास "तिने डोकीवरचा पदर खांद्यावर घेतला आहे," असे बोलण्याचा संप्रदाय आहे तो यामुळेच.

तशीच द्रविडांनीही आपली एक चाल मराठे पुरुषांना स्वीकारण्यास लाविली आहे. ती चाल देवकाची आहे. यासंबंधी विचार पूर्वी आलेच आहेत.

## दाक्षिणेतील द्रवीडाशी संबंध बरोबरीच्या नात्याचा.

महाराष्ट्रांतील मराठे व मूळचे रहिवासी द्रवीड यांचा एक मिश्र समाज तयार झाला आहे. त्याच्यामध्ये जित व जेते असा संबंध टिकल्याचे दिसत नाही. आर्य जेते होते व त्यानी द्रविडांस पूर्णपणे जिंकून त्यांच्यातील स्त्रियांस आपल्या बायका केले. पण ही गोष्ट जबरीची नव्हती तसे झाले असते तर आर्यसंस्कृति व आर्यसंप्रदाय त्यांचेवर लादले गेले असते. लग्नाचा मुख्य सौभाग्यालंकार चूडा झाला असता व गळ्यांतील डोरले हे केवळ शोभेचा दागिना राहता. भांगात रंग भरण्याची चाल सर्वत्र आली असती. बायकांच्या नांवापुढे देवी, कुवर वगैरे उपपदे लागली असती. पण असे न होता द्रविड संप्रदाय स्वतंत्रपणे मराठ्यांच्या बायकांत टिकून राहिले आहेत. यावरून पाहाता हा मराठे व द्रविड संयोग बरोबरीच्या नात्याने झालेला प्रेमाचा संबंध आहे.

विवाहविधीची सुरवात अंतःपटांतरित वधूवरांवर मंगलाष्टके ह्मणून अक्षता टाकणे, वधूवरानी एकमेकांच्या गळ्यांत माळा घालणे या कृत्यानी होते. हा गांधर्वविवाहविधि आहे व यात एकमेकांस पसंत करणे हे मुख्य तत्व आहे. यावरूनही उभय पक्षांचा समान दर्जा व समान योग्यता हीच दिसतात. पूर्वीच्या इतिहासाचे या रीतीने दृश्यरूप राखण्यांत आले आहे.

## मराठ्यांची भाषा.

आज प्रचलित असलेली मराठी भाषा निदान एक हजार वर्षांची जुनी आहे. भाषा हळू हळू बदलत जात असते.

पूर्वीची भाषा बदलत बदलत आजची मराठी भाषा बनली आहे हिची जुनी परंपरा कोठपर्यंत जाते हे पाहाणे बोधप्रद होईल.

## भाषा मुख्य, व्याकरण गौण.

कोणताही मानवसमाज उत्क्रान्तितत्त्वाप्रमाणे जास्त जास्त सुधारत जातो. त्याबरोबर त्याची भाषाही प्रगल्भ होत जाते. इतर भाषेच्या लोकांशी एका भाषेच्या लोकांचा संबंध आला म्हणजे त्या भाषेतील उपयुक्त शद्ब व तद्द्वारा विचार यांचा संग्रह या भाषेत होत असतो. शद्बसंख्या या कारणाने वाढत जाते. समाजाचे ज्ञान जसजसे वाढेल तसतशी भाषेची वाढ होते प्रथम काव्यरचना सुरू होते, मागाहून गद्यग्रंथ तयार होतात. या वेळी लिपि किंवा लिखी प्रचारांत येऊं लागते. ग्रंथ वाचणारा व अभ्यास करणारा वर्गही तयार होत जातो. यानंतर व्याकरणशास्त्र तयार होऊ लागते. जीवंत भाषेची जसजशी वाढ होईल तसतसे व्याकरणांतही ते बदल दाखल केले पाहिजेत. यासाठी निरनिराळ्या काळी भिन्नभिन्न वैय्याकरण होत असतात. भाषेला अनुसरणारे व भाषेचे नियम सांगणारे व्याकरणशास्त्र असते तोंपर्यंत या दोहोंची गट्टी असते. पण व्याकरणाच्या नियमांस फाजील महत्त्व येऊन या नियमाप्रमाणे प्रचलित भाषेच्या शुद्धाशुद्धतेचा निर्णय होऊ लागला व लोकव्यवहारातील अमुक प्रयोग अशुद्ध ह्मणून टाकाऊ असे ठरू लागले ह्मणजे व्याकरणानुसारी विद्वान व व्याकरणाची ओळख नसलेला बहुजनसमाज यांची हळू हळू फारकत होत जाते. विद्वानांची भाषा एका ठरीव सांचाची बनत जाते, तिची

स्वाभाविक वाढ खुंटते, तिच्यातील जीवंतपणा कमी कमी होत जातो. प्रचलित भाषा ही समाजाची भाषा नेहमीच्या बोलण्यातील असते. तिची वाढ चालूच असते. यामुळे विद्वानांची भाषा व चालू भाषा यांतील अंतर दिवसेदिवस वाढतच जाते. विद्वानांची भाषा बहुजनसमाजास समजेनाशी झाली ह्मणजे विद्वानांची भाषा हळू हळू मरत जाऊन अखेर कायमची मरते. व्यवहारासाठी विद्वानांना बहुजनसमाजाच्या भाषेचा उपयोग करावाच लागतो. शिक्षण, विद्यासंपादन वगैरे काम मृत भाषेत चालते. विद्वानांचे मृत भाषेतील ग्रंथ बहुजनसमाजास समजत नाहीसे होतात. आपले विचार बहुजनसमाजास कळावे अशी ज्यांची इच्छा असेल त्यांना त्या समाजाच्या भाषेत ग्रंथरचना करणे भाग पडते.

## वेदकाळी ही प्राकृत भाषा होती.

वेदाची सूक्ते निरनिराळ्या काळी भिन्न भिन्न मंत्रद्रष्टयाना दिसली आहेत. हे मंत्रद्रष्टे एकाच वर्णाचे नव्हते. यावरून वर्णव्यवस्था सुरू होण्याइतकी समाजाची प्रगति झाल्यावर वेदसूक्ते दिसली आहेत, असे होते. त्या वेळी सर्वच लोक वेदाची भाषा बोलत होते असे नाही. विद्वानांची ही भाषा होती. पण याशिवाय निराळी भाषा बहुजनसमाजाचीही होती.

कै. राजारामशास्त्री भागवत आपल्या प्राकृत भाषेची विचिकित्सा या निबंधात ह्मणतात: — " वेदांतलीं कित्येक सूक्तें कोणती तरी प्राकृत भाषा प्रचारांत असतांना रचलीं गेलीं, याविषयीं शंका राहात नाहीं. " यावरून वेदकाला-

पूर्वी एक भाषा होती. त्या वेळच्या विद्वानांच्या व अशिक्षितांच्या भाषेत थोडा फरक कालान्तराने पडत चालला. वेदसूक्ते निरनिराळया काळी दिसली. त्यामुळे वेदांतील भाषेतही थोडा फरक पूर्वीच्यांत व मागच्यात असणार. विद्वान वेदभाषेवर परिश्रम करीत. बहुजनसमाज आपली भाषा बोलत होता. विद्वानानी वेदभाषेला संस्कार देऊन व व्याकरणनियमानी बद्ध करून एक भाषा बनविली. तिला संस्कृत असे नाव दिले. बहुजनसमाजाच्या भाषेला यामुळे प्राकृत असे नांव संस्कृतिकरणाने मिळाले.

संस्कृत भाषेची काही दिवस संक्रमणावस्था होती. तीत इंद्र, चंद्र वगैरे वैय्याकरण झाले. पाणिनीचे व्याकरण प्रसिद्ध झाल्यावर पुढे संस्कृताची वाढ फारशी झाली नाही. कारण कोणी थोर वैय्याकरण पुढे जन्मला नाही. कात्यायनाने वार्तिकेच जोडली व पतंजलीने भाष्य केले. याप्रमाणे संस्कृत भाषा पूर्णपणे मृत झाली.

## लातिन ग्रीकपासून संस्कृतचे भिन्नत्व.

यूरोपखंडात लातिन व ग्रीक या भाषांस मृत भाषा ह्मणतात. पण त्या भाषात व संस्कृतात एक मोठा फरक आहे. लातिन या नावाचे लोक होते ते ज्या प्रदेशात येऊन राहिले त्याला लातियम असे नाव होते व ते जी भाषा बोलत तिला लातिन भाषा ह्मणत. बहुजनसमाजाची भाषा व विद्वानाची भाषा यात अंतर पडू लागले. विद्वान आपल्या व्याकरणाच्या आधारावर भाषेचा शुद्धपणा राखू लागले. समाजाची वाढ होऊ लागली तशी त्यांची भाषाही बदलत चालली.

अखेर समाजाची भाषा लातिनहून निराळी झाली. विद्वानांची लातिन त्यांना समजेचना. तेव्हा लातिन भाषा मृत झाली. पण विद्वानांनी तिला आश्रय दिला. तीत ग्रंथसंपत्ति वाढविली व बरेच दिवस ती सर्व यूरोपीय देशांच्या विद्वानांची भाषा होती. अशीच स्थिति ग्रीक भाषेची हुबेहूब झाली. आज ग्रीस देशांत ग्रीकभाषा आहे. पण ती पुराण्या व मृत ग्रीक भाषेहून अगदी निराळी आहे. सध्याची इतालियन देखील लातिनहून भिन्नच आहे.

संस्कृत या नांवाचे लोक असल्याचा दाखला नाही. त्या नावाचा देशही नव्हता. यावरून संस्कृत या नावाने जी भाषा आज ओळखली जाते ती भाषा कोणत्याही लोकांची व्यवहाराची भाषा नव्हती. विद्वान लोकांची ही विद्याभाषा होती. विद्वान तींत ग्रंथ लिहीत व तिचे सौंदर्य व ग्रंथसंपत्ति वाढवीत. पण प्राकृत ही चालू भाषा असल्याने जोरावर होती.

## प्राकृत आणि शीक्षा.

पाणिनीय शीक्षा ह्मणून ग्रंथ आहे त्यांत " त्रिषष्टिश्चतुःषष्टिर्वा वर्णाः शंभुमते मताः । प्राकृते संस्कृते चापि स्वयं प्रोक्ताः स्वयंभुवा ॥ " असे सांगितले आहे. येथे प्राकृत भाषेचे नाव अगोदर देऊन संस्कृताचे मागाहून दिलेले आहे. यावरून पहिले अनुमान प्राकृत ही संस्कृताच्या जोडीची स्वतंत्र भाषा आहे असे निघते. प्राकृत भाषेत स्वतंत्र वाङ्मयही असे व बरेच वेळा काही प्राकृत ग्रंथांचे भाषांतर संस्कृतमध्येही करीत. गुणाढ्य कवीने पैशाची नामक प्राकृत भाषेत

कथासरित्सागर नावाचा ग्रंथ लिहिला. त्याचे रूपांतर संस्कृतमध्ये एका पंडिताने केलेले आज उपलब्ध आहे. पुराणांतील काही पुराणेही प्रथम प्राकृतमध्ये लिहिली गेली व नंतर त्या प्राकृतचे संस्कृत भाषेत रूपांतर केले गेले, असे अनुमान मि. पार्गिटर यानी काढले आहे. सध्याच्या पुराणांत काही काही ठिकाणी छंदोभंग आढळतात. पण संस्कृत श्लोकांचे प्राकृतांत भाषांतर केल्यास छंदोभंग राहात नाही. यावरून मूळ पुराणे प्राकृतांतच लिहिली गेली व पुढे त्यांचे संस्कृतमध्ये रूपांतर झाले हे अनुमान सबळ दिसते. यावरून मूळची प्राकृत भाषा अगदीच गांवढळ नव्हती, तिची बरीच प्रगति झाली होती. पण जाड्या विद्वानांचा ओढा संस्कृतकडे असे.

## मरहट्ठीपासून इतर प्राकृत भाषा.

आर्य लोकांची मूळची भाषा पाअड ( प्रकट ) नांवाची असावी असे कै. राजाराम शास्त्री यांचे अनुमान आहे. त्याही भाषेत देशपरत्वे भिन्नपणा येत चालला. निरनिराळ्या भाषा बनूं लागल्या व त्यांस निराळी नावेही मिळत गेली. एका प्राकृतभाषेचे याप्रमाणे महाराष्ट्री, शौरसेनी, पैशाची, मागधी, अर्धमागधी इत्यादि भेद झाले व कालांतराने या निरनिराळ्या अशा भाषा झाल्या. जे लोक जी भाषा बोलतात त्या भाषेला त्या लोकांचे नाव देण्यात येते असा प्राचीन काळापासूनचा संप्रदाय आहे. ह्मणून वर दिलेली भाषांची नावे त्या त्या लोकांवरून पडली असावी. जसे पिशाचाची भाषा ती पैशाची, शूरसेनांची ती शौरसेनी, मगधांची ती मागधी वगैरे.

शिक्षेतील श्लोकाचा आणखी विचार केल्यास प्राकृत ही प्रमुख भाषा होती ह्मणूनच प्राकृतांत ह्मणजे बहुजनसमाजाच्या भाषेत किती वर्णोच्चार आहेत हेच मुख्यत्वे पाणिनीस सांगावयाचे होते. त्याप्रमाणे प्राकृतांत ६३ किंवा ६४ वर्ण शंभुमताने आहेत असे सांगून संस्कार दिलेल्या भाषेत देखील तितकेच आहेत, असे पुढेच विधान केले आहे. चालू संस्कृतात ळ हा वर्ण नाही. त्याची जागा डकार किंवा लकार यानी घेतली आहे. वैदिक संस्कृतांत तो आहे. माहेश्वरसूत्रांत तो नाही. प्राकृतात तो वर्ण कायम आहे. वर्णसंख्या प्राकृतामध्येच एकाने जास्त आहे.

कै. राजवाडे यांचे मत महाराष्ट्रीभाषा वैदिक भाषेपासून निर्माण झाली नसून वैदिक व महाराष्ट्री या दोन्ही एकाच इंडो-युरोपीय भाषेची अपत्ये आहेत. डॉ. केतकर ह्मणतात की, हे मत अधिक ग्राह्य होऊ लागले आहे. कै. राजारामशास्त्री भागवत ह्मणतात:—" सारांश, प्राकृतभाषा पुष्कळ जुनाट आहे. ती एकंदरींत मोड न पावतां टिकून राहिलेली दिसते. इतकेंच कीं, संस्कृत धर्माच्या ग्रंथांत राहिलें होतें व प्राकृत व्यवहारांत राहिलें होतें. धर्मांत संस्कृताचा एकछत्री अधिकार तर व्यवहारांत प्राकृताचा एकछत्री अधिकार याप्रमाणें उभयतांचा अधिकार अगदीं स्वतंत्र असल्यामुळे उभयतामध्यें टक्कर लागण्याचा प्रसंग पूर्वी येऊन गेलेला असण्याचा संभव नाहीं. धर्माचा अधिकार जसा ठराव वरचा तसा व्यवहाराचा ठराव खालचा असल्यामुळें जें वरचें किंवा वरच्या प्रतीचें किंवा सुधारलेले त्यास संस्कृत शब्द

लावण्यांत येऊन खालचें किंवा कमी प्रतिचें किंवा साधें किंवा जगांत सवंग असलेलें त्यास प्राकृत शब्द लावण्याची वहिवाट संस्कृत भाषेंत पडली. ” ( प्रा. भा. वि. पृ. ५।६ )

पुढें पृष्ठ ४४ —“ महाराष्ट्री संस्कृतापासून निघाली; महाराष्ट्री व संस्कृत या जोडीपासून शौरसेनी निघून शौरसेनीपासून मागधी व पैशाची निघाल्या, असें मानण्याचा संप्रदाय आहे याप्रमाणें महाराष्ट्री हें सगळ्या प्राकृत भाषेचें माहेर ठरतें. महाराष्ट्री लौकिक संस्कृतापासून निघाली नसून संस्कृताच्या पूर्वरूपापासून निघालेली आहे; व जसा एक पूर्वरूपी भाग तसा दुसरा देशी भाग, मिळून दोन्ही भाग सांधले जाऊन महाराष्ट्रीचें हरिहररूपी स्वरूप घडलेलें आहे. ” पृष्ठ ६५—“ बऱ्याच सूक्तांचेही काळीं वेदांतल्या भाषेस जागतेपणा नव्हता, असा परिष्कार पहिल्याच फुलांत करण्यांत आला आहे. ह्मणून ‘ वैदिकी ’ असें नांव संस्कृताच्या जागत्या रूपास देणें बरें न वाटून, ‘ पूर्वरूप ’ असेंच नांव देणें प्रशस्त वाटलें. प्राकृत भाषेचें प्रकृतिविकृतिभावाचें नातें लौकिक संस्कृताशीं नसून, संस्कृताच्या पूर्वरूपाशीं आहे, ही एक गोष्ट जशी लक्षांत ठेविली पाहिजे, तशी प्राकृत भाषा सर्वस्वीं संस्कृताच्या पूर्व रूपापासून निघालेल्या नसून, बऱ्याच अंशीं त्यांचा संस्कृताच्या पूर्वरूपाशींही संबंध लागत नाहीं, अर्थातच त्यांस ‘ देशी ’ असाही एक पाया आहे, ही दुसरीही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. प्राकृत भाषांचीं नांवें त्या त्या लोकांवरून किंवा त्या त्या लोकांनीं वसविलेल्या देशांवरून पडलेलीं आहेत, याविषयीं शंका नको. ”

## प्राकृत भाषेची व्याकरणे.

प्राकृत भाषेची बरीचशी व्याकरणे उपलब्ध आहेत. त्यांतील मुख्य कात्यायनाचे ‘ प्राकृतप्रकाश ’ नावाचे आहे. याच्या १२ परिच्छेदांपैकीं ९ महाराष्ट्रीस मिळाले. १० वा पिशाचीस, ११ वा मागधीस, १२ वा शूरसेनीस अशी या ग्रंथाची वाटणी आहे. ९ व्या परिच्छेदाचे अखेरीस “ शेषः संस्कृतात् ” ( बाकीचे नियम संस्कृत भाषेतून ) असा शेरा मारला आहे, त्यापक्षीं कात्यायनाचा मुख्य उद्देश मरइट्टीचा संस्कृताशीं मेळ किती आहे तो दाखविण्याचा दिसतो........ याप्रमाणे कात्यायनाची दृष्टि दोहोंमधल्या सारखेपणाकडे गेली. अर्थातच दोहोंमधल्या गैरसारखेपणाकडे कात्यायनाची दृष्टि वळलेली नाही. शूरसेनीच्या अखेरीस शेषं महाराष्ट्रीवत् असा शेरा कात्यायन मारतो. कात्यायनानंतर सुमारे दीड हजार वर्षांनी हेमचद्र झाला. त्याने संस्कृत व्याकरण करून त्याच्या आठव्या अध्यायांत प्राकृत भाषांचे व्याकरण घातले आहे. याच्या वेळीं प्राकृत भाषा प्रचारांतून जाऊन मराठी, गुजराती वगैरे भाषा प्रचलित होत्या. हेमचंद्राचे व्याकरण मृत भाषांचेच आहे. हा महाराष्ट्री शद्बाच्या बदला नेहमी प्राकृत शद्ब योजितो. मार्कंडेय नांवाच्या ग्रंथकाराचे प्राकृतसर्वस्वनामक व्याकरण आहे. याने प्राकृत भाषांची संख्या जास्त दिली आहे.

या वैय्याकरणांचे मत महाराष्ट्री ही संस्कृतापासून झाली असेच होते ; पण हे मान्य करण्यासारखे नाही. बहुतेक सर्व विद्वान व शोधक लोकांनी या मताचा त्यागच

केलेला आहे. महाराष्ट्री हीच प्राकृत व तिच्यापासून शौरसेनी, मागधी, पैशाची वगैरे भाषा भिन्न झाल्या हे सरळच आहे. महाराष्ट्रीमध्ये जे थोडे ग्रंथ उपलब्ध आहेत त्यातील भाषा व आजची मराठी भाषा यात फार तफावत आहे. पण आजची मराठी निदान ८।९. शे वर्षांची जुनी असल्याने मधल्या १०००।१२०० वर्षांच्या काळात महाराष्ट्री व मराठी यात अंतर पडावयाचेच.

रा. रा. भागवत आपल्या "मराठ्यांसंबंधीं चार उद्गार" या ग्रंथांत समारोप करतातः– "तेव्हां व्रजभाषा, हिंदीभाषा व हिंदुस्थानीभाषा हे शब्दच प्राचीनकाळीं नव्हते ; व जर "महाराष्ट्री" शब्द प्राचीनकाळीं कात्यायनाच्या सूत्रावरून विचार करितां निःसंशय होता, व ही महाराष्ट्री भाषा जर कात्यायनच शौरसेनी भाषेचीं म्हणजे व्रजभाषेचें मातृस्थान भोगणाऱ्या भाषेची प्रकृति समजतो, तर प्राचीन मऱ्हाठी व तिच्याबरोबर ती बोलणारे मऱ्हाटे पूर्वीं चांगले हिमालयापर्यंत पसरलेले असून, एव्हांच्या काळीं हिंदुस्थानांत ज्या भाषा चालत आहेत, जे आचारविचार चालत आहेत, व जे धर्म चालत आहेत, त्या सर्वांचें एक मूळ मऱ्हाठी भाषा व मऱ्हाठे, असें ह्मटल्यास त्यांत कांहीं गैर नाहीं."

## धर्मसंस्थापक व सुधारक प्राकृताचा आश्रय करतात.

धर्मसंस्थापक व धर्मसुधारक यांस आपला संदेश बहुजनसमाजास कळवावयाचा असतो. केवळ विद्वानांसच तो कळून उपयोग होत नाही. यासाठी खरे धर्मसंस्थापक

आपले ग्रंथ देशी भाषेतच लिहितात. भगवान् बुद्ध व त्याचे शिष्य याना पालीभाषेत उपदेश केला व त्या भाषेतच आपले सर्व ग्रंथ लिहिले. त्याच्यापूर्वीचा जैनधर्मसंस्थापक महावीर याने मागधी भाषेत उपदेश केला व आपले सर्व ग्रंथ लिहिले. याप्रमाणे पाली व मागधी या दोन भाषात धार्मिक वाङ्मय व त्यामुळे न्याय, व्याकरण वगैरे शास्त्रे यांची चांगली समृद्धि झाली.

## धर्मसंस्थापनेस महाराष्ट्र नालायक.

मराठ्याची मनोरचनाच काही विलक्षण आहे. इतरांपेक्षा धर्मभोळेपणा कमी आहे, चौकस बुद्धि जास्त आहे. कोणत्याही गोष्टीवर सहज विश्वास ठेवणारे ते नाहीत. ह्मणून या लोकात धर्मसंस्थापक उत्पन्न होणे कठीणच आहे. ह्मणून प्राचीन महाराष्ट्रीमध्ये धर्मसंबंधी वाङ्मय यथायथाच असणार. पण इतर वाङ्मय मात्र पुष्कळ असावे असे दिसते. आज रोजी सेतुबंध व सप्तशति ही दोन काव्ये व कर्पूरमंजरी हे सबंध नाटक महाराष्ट्रीत आहे. याशिवाय उपलब्ध असलेल्या सर्व नाटकात काही काही प्रमुख पात्रांची भाषा महाराष्ट्री ह्मणजे दाक्षिणात्य असावी असा भरतमुनींने नियमच घालून दिलेला आहे. नाटकाची प्रथा मूळची प्राकृतांतील. ती मग संस्कृत विद्वानानी उचलली असे यावरून अनुमान होते. सप्तशती काव्यांत निरनिराळे पुरुष व स्त्री कवि यानी केलेल्या गाथांचा संग्रह आहे. मराठासमाजांत त्या वेळी उत्तम कविता करणाऱ्या प्रतिभावान स्त्रियाही होत्या. यावरून स्त्रियांना त्या वेळीं शिक्षण मिळे व बरेच स्वातंत्र्यही होते असे दिसते.

## संतसाधु व मराठी.

महाराष्ट्रीपासून पुढे शके १००० सुमारास आजची मराठी भाषा झाल्यावर महाराष्ट्रांत समाजसुधारक संतांचा उदय झाला. त्यांत महानुभावपंथीयांचा उल्लेख प्रथम केला पाहिजे; कारण मराठीच्या आदिग्रंथलेखनाचा मान त्यांना आहे. नंतर मुकुंदराय, ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम वगैरे पुष्कळच संत व समाजसुधारक उदयास आले आणि त्यानी बहुजनसमाजाच्या ह्मणजे मराठी भाषेतच आपली ग्रंथ-रचना केली व त्या भाषेत धार्मिक ह्मणजे वेदांतविषयक ग्रंथांची समृद्धि केली.

## इतर भाषांचा मराठीवर परिणाम.

साधुसंत, गोसावी वगैरेच्या यात्राप्रसंगाने व्रज भाषेचा व पुढे मुसलमानी राज्य स्थापन झाल्या कारणाने उर्दू भाषेचा परिचय इकडील लोकांस झाला व या भाषेच्या शब्दानी मराठी भाषेत जागा पटकावली आहे. अलीकडे इंग्रजी शिक्षणाचाही परिणाम मराठी भाषेवर भलाबुरा होत आहे. परक्या भाषेतील शब्द आपल्या भाषेत घेणे गैर नाही ; पण त्या शब्दांवर आमच्या भाषेचे प्रभुत्व पाहिजे. आमच्या आचार-विचाराप्रमाणे त्यानी वागले पाहिजे. परक्या भाषेचा वाक्य-संप्रदाय ( Idiom ) आमच्या डोकीवर बसता कामा नये. आमचे " डोळे पाण्याने भरू द्या " पण त्यांत " अश्रु उभे राहता " कामा नयेत.

मराठी भाषेच्या जननीचा मान संस्कृताकडे नाही हे वर सांगितलेच आहे. पण संस्कृत ही आमच्याच देशच्या

विद्वानांची विद्वत्तेची भाषा आहे. या कारणाने तीत अनेक विषयांवर फार मोठे ग्रंथभांडार आहे. शिवाय हिंदी, उर्दू किंवा पर्शियन या भाषांचा प्रसार होण्यापूर्वी सर्व देशातील विद्वानांस समजणारी अशी देशाची एक भाषा संस्कृतच असल्याने तिचा संसर्ग इतर देशी भाषांस होणें अपरिहार्य असून तो लाभकारकही झाला आहे.

दुसऱ्या भाषेतील शब्द व विचार घेण्यास आपण हमेषा तयार असले पाहिजे. पण यास कोणती मर्यादा असावी हे मी आताच सांगितले आहे. पूर्वकाली शक, यवन, मग वगैरे अनेक परदेशचे लोक या देशात घुसले व स्थायिक होऊन आमच्यात मिसळून गेले. असे परके शब्द भाषेत मिसळून जाऊन आमच्या भाषेचे नियम त्यानी पाळावे. संस्कृत शब्दांसही हाच नियम लागू झाला पाहिजे. अश्रु शब्द संस्कृतात ऱ्हस्व व नपुंसकलिंगी आहे म्हणून मराठांतही तो तसाच पाहिजे असे प्रतिपादन केल्यास त्यास विरोध केला पाहिजे. संस्कृतांत विघ्न शब्द पुल्लिंगी बलवान असो, आह्मा मराठ्यांच्या दृष्टीने विघ्न नपुंसकच पाहिजे.

प्राकृत व संस्कृत या भाषा पूर्वीपासून भिन्न असल्या तरी त्या एकमेकींपासून शब्द व विचार घेत होत्याच. पण तेव्हा परक्या भाषेचा अंमल चालू नये याविषयी दक्षता राखण्यांत येई.

चालू इंग्रजी अमलांत ही स्थिती बदलत चालली असून कमी अधिक प्रमाणावर देशी भाषा परावलंबी होत

आहेत व त्यायोगानें त्यांची खरी उन्नति होत नाही. याचे वाईट परिणाम बंगालमध्ये स्पष्टपणे नजरेस येत आहेत. इतर प्रांतातही थोडी थोडी तशीच स्थिति होत आहे ही खेदाची गोष्ट आहे. सन १९११ च्या हिंदुस्थानच्या खानेसुमारीच्या रिपोर्टात पान ३०७ वर बंगालची जी केविलवाणी स्थिति वर्णिली आहे ती आह्मी सर्वांनी विचार करण्यासारखी आहे.

## बंगालची शोचनीय स्थिति.

" एका अलिकडील बंगाली पुस्तकात शेंकडा ८८ शब्द शुद्ध संस्कृत होते असे प्रत्यक्ष शब्द मोजल्यावर दिसून आले. या शब्दांची त्या ग्रंथात जरूरच होती असे नव्हते. त्यांच्या जागी अस्सल देशी शब्द घालता आले असते. संस्कृत शब्दांच्या अशा विनाकारण फाजीलपणाचे परिणाम खेदकारक होतात. बंगाली भाषेचे आता दोन भाग पडले आहेत. एक सर्व लोकांस समजणारी भाषा व दुसरी पुस्तकांतील भाषा. ही संस्कृत न समजणाराला कळत नाही आणि छापील लेखांतच आढळते. अशा रीतीने ग्रंथसंपत्ती आणि बहुजनसमाज यांची कायमची फारखत झाली आहे. सुशिक्षितवर्गास याची यत्किंचितही परवा वाटत नाही. मागच्या सेन्ससरिपोर्टात मि. बेन्स यानी ह्मटल्याप्रमाणे " हुगळी नदीवर इंग्रजी सत्ता स्थापन झाल्याकारणाने पूर्व हिंदुस्थानांत शिक्षणाचे पुनरुज्जीवन झाले. त्याचे अपत्य बंगालीचे हे संस्कृतप्रायरूप आहे. मोंगल अमलांत देशी भाषेचे शिक्षण मुळीच नव्हतें व देशाची सर्व बाबतीत हेळसांड होत होती. या कारणाने देशी भाषा ग्राम्य व अपुरी आहे असे दिसले,

अथवा बहुश: तो तशी आहे असा चुकीचा समज झाला. कलकत्ता हे एकटेच शिक्षणाचे केंद्र झाले. तेथे जुन्या भाषेच्या मोडीला अनुरूप नवीन शब्दांची भर घालून तिला मजबुती आणण्याचे सोडून तिला न झेपणारे असे निव्वळ संस्कृत शब्द व प्रयोग यांची गर्दी उडवून दिली आहे. विद्वानांस त्या त्या काळी भाषेसंबंधी ज्या ज्या उणीवा भासल्या त्या पुऱ्या पाडण्यास शक्य तितके प्रकार संस्कृतांतून घेतले गेले. एखाद्या जुन्या वस्त्राच्या ताण्याला तसल्याच सुताने मजबुती आणण्याचे सोडून त्या कमताकद कापडावर तलम रेशीम व वजनदार जर यांचे अंगभर भरतकाम केल्यास त्या कापडाची जी अवस्था होईल तीच बंगाली भाषेची झाली आहे. दुसऱ्याच्या धर्मादायावर जगणारा कायमचाच भिकारी राहातो हे स्विफ्टचे सुभाषित सत्य आहे. याच कारणाने बंगाली या देशी भाषेची वाढच खुंटली आहे. पचविता येणार नाही असे सकस अन्न एखाद्या मुलाच्या तोंडात जबरीने कोंबीत गेल्यास त्याची वाढ खुंटते तीच गत बंगालीची झाली आहे. " हा बेन्सने दिलेला दृष्टांत फार मार्मिक आहे. चांगले मोठे झालेले मूल आईने नेहमी आपल्याजवळच ठेवले तर ते प्रत्येक वेळी तिच्या तोंडाकडे पाहात राहाणार व त्याला स्वतःच्या बुद्धीने काहीच करता येणार नाही. अशा मुलाची व बंगालीची स्थिति सारखीच झाली आहे असे बेन्स ह्मणतो.

## हिंदी भाषेचे निष्कारण पारतंत्र्य.

विशेषेकरून हिंदीला अशाच वाईट दृष्टीची बाधा होईल अशी चिन्हे दिसत आहेत. वंग भाषेला संस्कृताची

गरज भासली तशी गरज हिंदीला भासण्याचे मुळीच कारण नाही. ज्या प्राकृत भाषांपासून हिंदी बनली आहे त्या भाषा बाहेरची कसलीही मदत न घेता माणसाच्या मनांत जे जे विचार येतात ते उत्तम रीतीने व्यक्त करण्यास समर्थ आहेत; व पांचशे वर्षे तसे काम त्यांच्याकडून झालेले आहे. हिंदीचे मूळ शब्दभांडार फार मोठे विस्तृत आहे. आणि पारिभाषिक शब्द तयार करण्यासारखी त्या भाषेत पूर्ण ताकद आहे. हिंदीच्या जुन्या ग्रंथसंपत्तीत उच्च दर्जाच्या काव्यमय कल्पनापूर्ण भराऱ्या आणि भक्तिरसाने थबथबलेले असे प्रख्यात धर्मसंस्थापकांचे उपदेश यांचा भरपूर साठा आहे. तीत तत्त्वज्ञान व अलंकारशास्त्र यांवर ग्रंथ आहेत. यांतील विषयप्रतिपादन संस्कृत पंडितांच्या कुशाग्र बुद्धीशी स्पर्धा करण्यासारखे असून त्यांत संस्कृत शब्दाचा उपयोग क्वचितच सांपडेल. एवढी शब्दसंपत्ति व इंग्रजी भाषेच्या निदान बरोबरीची विचार व्यक्त करण्याची सामग्री हिंदीजवळ असूनही उत्तर हिंस्थानच्या कोट्यावधि लोकांस समजतील अशी पुस्तके न लिहिता थोड्याशा संस्कृत जाणणाऱ्या विद्वानांनाच समजतील अशा पुस्तके लिहिण्याची एक फॅशनच सध्या निघाली आहे. या शोचनीय स्थितीची जबाबदारी इंग्रजी सत्तेवरही कमी नाही. संस्कृताच्या अभिमान्यांच्या पारड्यातच त्यांनी आपल्या कृपेचे व आश्रयाचे वजन टाकले आहे.

## मराठीची अनुकंपनीय स्थिती.

आमच्या मराठीची स्थिती बंग भाषेइतकी खेदकारक नसली तरी हिंदीइतकी अनुकंपनीय खास झाली आहे.

मराठी पुस्तकांचा खप होत नसल्याने त्यांत उच्च दर्जाचे वाङ्मय तयार होत नाहीं अशी तक्रार नेहमी ऐकण्यात येते. पण मराठी बोलणाऱ्या सुमारे दोन अडीच कोटी लोकांपैकीं किती हजार लोकांस सध्याच्या विद्वानांचे ग्रंथ समजतील याचा विचार केल्यास संस्कृताच्या फाजील आवडीने आमचे बरेच नुकसान होत आहे असे कबूल करावे लागेल.

## जपानने काय केलें ?

या कामी जपान्यांचा कित्ता वळविण्यासारखा आहे. त्यांना आपल्या मायभाषेचा मोठा अभिमान आहे व सर्व जगांतील ग्रंथसंपत्ती शोधून आणून त्यानी आपल्या भाषेतील वाङ्मयांत भर घातली आहे. त्यांच्या एका ग्रंथकाराच्या झोर-क्याविषयी मी वाचले आहे. त्याचा बाणा आपले पुस्तक खेडगावातील माणसासही समजले पाहिजे असा असे. अशाच पुस्तकांच्या वाचनाने लोकांत शिक्षणाची आवड वाढते व जे काय थोडेबहुत ते शिकतात ते कायम राहाते व वाढते.

## मराठी क्रमिक पुस्तकें.

शाळाखात्यातील मराठीची क्रमिक पुस्तके या बाबतीत सर्वस्वी टाकाऊ आहेत. यातील बहुतेक धडे प्रथमतः इंग्रजीत लिहिण्यांत आले व त्याची मराठी, गुजराती, सिंधी, कानडी, उर्दू अशा देशी भाषांत भाषांतरे करण्यात आली. भाषांतर-कार संस्कृतांत पारंगत, व मराठी कवि आणि जुने ग्रंथ यांचे अनोळखी. भाषांतरात थोडे अडले की, संस्कृत शब्दाकडे

धाव. भाषा कृत्रिम, मायभाषेचा जिव्हाळा तिला नाही. या कारणाने पुस्तके फार नीरस झाली आहेत. त्यांतील दुर्बोध शब्दांचा अर्थ सांगण्यासाठी तशी पुस्तके तयार करावी लागली आहेत. घोडा ह्मणजे अश्व असे शब्द पाठ करण्याची पाळी येत आहे. या पुस्तकांतील भाषा भाषांतरकर्त्यांच्या घरांत देखील बोलली जात नाही. याप्रमाणे मराठी जीवंत भाषा असता तिचा अभ्यास मृतभाषेप्रमाणे शाळाखात्यात चालू आहे. अशा पुस्तकांच्या वाचनाने शेतकऱ्याच्या मुलाच्या मनावर चांगला ठसा उमटत नाही व विद्येची गोडी उत्पन्न होत नाही, यात आश्चर्य कसले! शाळा सुटल्यावर थोड्याच दिवसांत तो पुन्हा निरक्षर बनतो असा अनुभव कैक ठिकाणी आला आहे.

## या कामी स्वावलंबन पाहिजे.

दिवाणांच्या हातून ही स्थिती पालटण्याचे काम होईल असे मला वाटत नाही. तीन वर्षेपर्यंत तो प्रयत्न मी केला; पण त्यांत फारसे यश आले नाही. मराठी भाषेचा अभिमानी असा दिवाण आणखी किती वर्षेपर्यंत लाधणार नाही हेही सांगता येत नाही. यासाठी सरकारवर अवलंबून न राहाता या कामी लोकानाच प्रयत्न केले पाहिजेत. हे प्रयत्न ह्मणजे चांगली, सोपी, जीवंत मराठी भाषा लिहिणारानी क्रमिक पुस्तके लिहिली पाहिजेत व ती शाळांतून सुरू करण्याचे काम आमच्या म्युनिसिपालिट्या व डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड यानी केले पाहिजे. पण पुस्तके लिहिणारानी आपले ध्येय साधे शिक्षणाचे ठेविले पाहिजे. राजकीय सुधारणा,

धर्मसुधारणा, सामाजिक सुधारणा, आरोग्यशास्त्र, सहकार्य, मद्यपानबंदी वगैरे विषयांवरील धड्यांचा मारा करून आप-आपले विषय विद्यार्थ्यांच्या मेंदूत कोंबण्याची महत्त्वाकांक्षा सोडून दिली पाहिजे. मुलांस चांगले वाचता येऊ लागले व वाचलेले समजू लागले ह्मणजे बाकीचे विषय त्यांला पसंत पडल्यास ते शिकतील.

## शाबास गुजरात!

गुजराती लोकांचे अनुकरण या कामीं करणे योग्य होईल. महात्मा गांधींच्या गुजरात विद्यापीठाने एक पुस्तक-माला तयार केली आहे. पहिले, दुसरे व तिसरे अशीं तीन पुस्तके मी पाहिली आहेत. भडोच म्युनिसिपालिटीने ती आपल्या शाळांत सुरू केली. शाळाखात्याचा नियम त्या खात्याने मंजूर केलेलीच पुस्तके शिकविली पाहिजेत असा आहे. नव्या पुस्तकांस मंजुरी मिळण्याची अडचण. गुजराती विद्यापीठ मंजुरी मागणारे नाही. आता म्युनिसिपालिटीला काय शिक्षा करावी याचा विचार सुरू झाला. तेव्हा प्रश्न निघाला की, सदर पुस्तकात हरकत घेण्यासारखे काही आहे काय? पहिल्या दोन पुस्तकात आक्षेप घेण्यासारखे काहीं नव्हतेच. ती ताबडतोब मंजूर करण्यात आली. तिसऱ्यात दोन धड्यास हरकत घेण्यात आली. ते धडे काढून टाक-ल्यावर तेही पुस्तक चालू करण्यास हरकत नाही असे ठरले. स्वावलंबनाच्या पद्धतीवर गुजराती लोकानी सरकारी क्रमिक पुस्तकाना बाजूस काढण्याचा मार्ग काढला व आपल्या चिकाटीने तो मान्यही करून घेतला. पहिली तीन क्रमिक

पुस्तके कोणी चांगली तयार करून छापली व ती निदान एका डिस्ट्रिक्टने आपल्या शाळांतून चालू केली तरी हा व्यवहार फायदेशीर होईल. निरनिराळी चांगली पुस्तके चढाओढीने तयार होतील व एकंदरींत लाभच होईल.

या प्रकारचे प्रयत्न मराठी भाषेच्या अभिमान्यांकडून पूर्वी झालेच नाहींत असे नाहीं. कै. गोळे यानी अशी पुस्तके तयार केली होती त्यांतील पहिले मी पाहिले होते. त्यांतील पहिल्याच धड्यातील पहिलेच वाक्य ब्राह्मणाची मुलगी असे होते पहिल्या घासांतच माशी पडावी असा हा दुहेरी जोडाक्षरांचा मारा या पुस्तकास मारक झाला असावा. त्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचा योग आला की नाही कळले नाही.

## संस्कृतमय बोजड भाषा ही मराठ्यांच्या शिक्षणांत धोंड आहे.

या चालू राजकारणाच्या विषयावर बोलून मी आपला निरर्थक वेळ घेतला असा कोणी आरोप करील. मराठ्यांचे व त्याबरोबरच महाराष्ट्राचे भवितव्य बहुजनसमाजाच्या शिक्षणावर अवलंबून आहे. आजपर्यंत या शिक्षणाची हेळसांड झाली आहे. शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा आमच्या सावकार व उदमी लोकानी घेऊन त्याना कर्जबाजारी करून ठेवले आहे. पण आतांच्या स्वस्ताईने शेतकऱ्यांपेक्षा सावकार व उदमी लोकांचेच नुकसान जास्त होईल असा संभव दिसतो. आता शेतकरी सुखी तर इतर वर्ग सुखी असा काल येत आहे. या वेळी शेतकरी ह्मणजे मराठावर्गाच्या उन्नतीचा प्रश्न देशाच्या जिव्हाळ्याचा झाला आहे.

बहुजनसमाजाला शिक्षण निदान स्वभाषा लिहिता वाचता येण्याइतके तरी पाहिजे आहे. आमची लिपी सोपी आहे. एका अक्षराला एकच उच्चार व एक उच्चारासाठी एकच अक्षर आमच्या लिपीत आहे, अशी आम्ही प्रौढी मारतो. पण आमच्या व्याकरणाच्या फाजील आवडीने व शुद्धलेखनाच्या विलक्षण आचाराने आमच्या शेतकरीवर्गांत शिक्षणप्रसार होण्यास कशा अडचणी येत आहेत इकडे आम्ही लक्ष देत नाही. अनुस्वारांचे व अनुनासिकांचे लोढणे आम्ही निष्कारण बांधून घेत आहो. ते सोडून टाकल्यास आमची प्रगती जास्त वेगाने होईल.

## निरुपयोगी अनुस्वारांस फांटा द्या..

भाषेच्या आरंभी अनुनासिकांची गर्दी असते. संस्कृतमध्ये तशी होती. पण ती अनुनासिके प्रचारांतून गेल्यावर व्याकरणाच्या नियमासाठीं ती कोठे कोठे आहेत हे सांगण्यास सुरवात झाली. प्राकृत महाराष्ट्री व तिच्यापासून निघालेल्या शौरसेनी, मागधी वगैरेतही अनुनासिके बरींच होती. चालू मराठींत ती आणखी कमी झाली. कोकणांतील उच्चारांत देशावरील ह्मणजे खऱ्या महाराष्ट्रांतील भाषेपेक्षा थोडी जास्त आहेत. देशावर बहुतेक कमीच आहेत. आपण बोलतो तसे लिहीत जाणे हेच श्रेयस्कर आहे. कारण लेख हा उच्चाराची प्रतिकृती पाहिजे. व्याकरण व भाषाशुद्धि यावर जोर देण्याने आपण आपल्या मुलाचे लक्ष भलत्याच कमी महत्त्वाच्या अभ्यासाकडे गुंतवीत आहो. आमचे नैय्यायिक किंवा वैद्य किंवा वेदांत वगैरे शास्त्र शिकणारे घ्या. हे व्याकरणाचा अभ्यास व्युत्पत्तीच्या पलीकडे करीत नाहीत. भाषा समजू लागली ह्मणजे त्यांचे व्याकरण संपले. नैय्यायिक तर

फार अशुद्ध बोलणारे, अशी वैय्याकरण त्यांची चेष्टा करीत. पण शब्दाचा कीस काढण्यांत फायदा कोणता? शब्दाच्या अर्थाचे महत्त्व आहे. विचाराचे त्याहून जास्त. यासाठी व्याकरण व भाषाशास्त्र यावर सर्वच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले पाहिजेत असा नियम शाळाखात्याने घातल्याने ब्राह्मणादि पुढारलेल्या वर्गाचे विशेष नुकसान झाले नाही. पण शेतकरी वगैरे अडाणी लोकांच्या शिक्षणाचे फार नुकसान झाले आहे. आपले विचार लिहिता येणे व दुसऱ्याचे लिहिलेले विचार वाचता येऊन समजणे हा मुख्य उद्देश असावा. शुद्धाशुद्धतेची कटकट भाषेचा विशेष अभ्यास करणाराच्या डोकीवर ठेवावी. तो बोजा सर्वांनी वहावा व तसे करून तत्त्व गमवावे हे आमच्या देशाच्या दृष्टीने विघातक आहे.

## मराठे संग्राहक आहेत.

मराठा ही एक महाराष्ट्रांत प्रमुख अशी जात आहे. पण ही जात इतर जातींसारखी एकलकोंडी नाही. या जातीला राष्ट्रीय जात हे नांव शोभते. राष्ट्रीय जात संग्राहक असते. इतर जाती तशा संग्राहक नाहीत. आज जो मराठा नाहीं व कोणत्याही जातीचा नाहीं असा हिंदू मनुष्य प्रयत्न करील तर त्यास मराठा जातीत अगदीं खालच्या दर्जावर तरी जागा मिळेल व त्याच्या घराण्याची योग्यता जसजशी वाढत जाईल तसतसे ते घराणे वरवर चढेल. हा राष्ट्रीयधर्म मराठ्यांच्या जीवंतपणाची साक्ष देत आहे. समाजसुधारकांचे प्रयत्न जातिभेद मोडण्याचे चालू आहेत; पण त्यांच्या प्रयत्नास यश येत नाही. कारण त्या यत्नाने जाती न मोडता एक नवीन जात उत्पन्न होते. ही आपत्ति टाळावयाची असेल तर

या कामी मराठा जातीचे साह्य घेतल्यास नवीन जात उत्पन्न करण्याची आवश्यकता राहाणार नाही व योग्य प्रयत्नांती मराठा जातीतच त्यांचा समावेश होईल. डॉ. केतकर यानी ' ब्राह्मणकन्या ' या आपल्या उपन्यासांत शेवटी हाच निष्कर्ष काढला आहे तो विचार करण्यासारखा आहे. पण मराठासमाजांत प्रवेश असा सहजासहजा मिळत नाही. या कडक जातिनिर्बंधाच्या काळांत पूर्वीपेक्षा त्रास जास्त होईल व दिनावधिही जास्त लागेल. जातीचा संग्राहकपणा हा गुण कमी अधिक मानाने बहुतेक क्षत्रिय जातीत आढळतो, ते एक क्षत्रियत्वाचे गमक आहे असे ह्मटल्यास चालेल.

मराठ्यांची संख्या जवळ जवळ कोटीची आहे. कारण कुणबी ह्मणून गणलेल्यांचा समावेश मराठ्यांतच केला पाहिजे. या वर सांगितलेल्या संग्राहकपणाच्या गुणामुळे मराठा या राष्ट्रीय जातीची संख्या हळू हळू वाढतच जाणार, लहानलहान संख्येच्या जातीनी योग्य प्रयत्न केल्यास व मराठी रीतरिवाज स्वीकारल्यास त्यांचा ओढा या जातगंगेत मिळून त्याला गंगात्व मिळेल. लहान लहान जाति या दिवसात टिकणे कठीण आहे. त्यानी एक नाहीसे तरी व्हावे किंवा दुसऱ्या जातीत मिसळून तरी जावे. महाराष्ट्रात ही मोठी जात याप्रमाणे सर्वांना पावन करण्यास समर्थ आहे.

" दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् " अशी ज्यांना धमक आहे त्यांना उत्तेजन या जातीतच मिळणारे आहे. कर्ण हा सूतपुत्र मानला गेला तरी अंगदेशाधिप झाल्यावर [illegible] त्याच्या शौर्यामुळे क्षत्रियांत जागा मिळालीच.

# आमची पुस्तके.

| | | किंमत आ. | पै |
|---|---|---|---|
| १ | मराठे आणि त्यांची भाषा | ८ | ० |
| २ | सृष्टिविज्ञान भाग १ ला | ८ | ० |
| ३ | सृष्टिविज्ञान भाग २ रा | ८ | ० |
| ४ | ब्रिटिश राज्यघटनेची रुपरेखा | ६ | ० |
| ५ | शककर्ते शिवाजीमहाराज यांचा पोवाडा | ४ | ० |
| ६ | राजर्षि शाहूमहाराज यांचा पोवाडा | ५ | ० |
| ७ | नरवीर तानाजी मालुसरे यांचा पोवाडा | ३ | ० |
| ८ | अधुनिक फाजील सुधारणेचा पोवाडा | १ | ६ |
| ९ | हिंदुस्थानच्या दारिद्र्याचा पोवाडा | १ | ६ |
| १० | धर्मभ्रष्ट हिंदूंचा धूळा | १ | ० |
| ११ | रेणुका महात्म्य–आईची अंबील | २ | ० |
| १२ | सद्बोध | २ | ० |
| १३ | सुबोध सुमनावली | २ | ६ |
| १४ | मंगळाष्टके आरत्या व पंक्तित म्हणण्याचें अभंग | १ | ० |
| १५ | श्रीकृष्ण लिलामृत | | ० |
| १६ | रामहृदय | | ० |
| १७ | दगलबाज शिवाजी | | ० |
| १८ | सातारचे दैव का दैवाचा सतारा | ३ | ० |
| १९ | कुमारिकांचे शाप | ४ | ० |

REFBK-0004459

| | | किंमत आ. | पै |
|---|---|---|---|
| २० | धर्म आणि ब्राह्मण | ६ | ० |
| २१ | धर्माची देवळे कीं देवळांचा धर्म | १ | ० |
| २२ | बाल ध्रुव | ४ | ० |
| २३ | ब्राम्हणाहून न्हावी श्रेष्ठ | १ | ० |
| २४ | राष्ट्रोद्धारक मेळा पद्यसंग्रह | १ | ० |
| २५ | कोल्हापूर प्रांताचा सोपा इतिहास | २ | ० |

---

**नांवें नोंदवा ! अमुल्य संधी !! नांवें नोंदवा !!!**

## सुप्रसिद्ध लेखक व वक्ते

# श्रीयुत केशवराव ठाकरे

यांची सर्व महाराष्ट्रानें नांवाजलेली व लोकादरास पात्र झालेली पण आज दुर्मिळ असलेली पुस्तकें खालीलप्रमाणें छापीत आहोत तरी वाङ्मय भक्तांनीं अवश्य नांवें नोंदवावीत व मागणी करावी.

| | किंमत रु० | आ. | पै. |
|---|---|---|---|
| सातारचे दैव कीं दैवाचा सतारा | ० | ३ | ० |
| दगलबाज शिवाजी | ० | ३ | ० |
| कुमारिकांचे शाप | ० | ५ | ० |
| रंगोबापुजी यांचे चरित्र | | | |
| क्रांतीचे कुलपी बाँब | | | |

पत्ता.

ता० १०।७।३२

प्रकाशक–दासराम बुकडेपो
महाद्वार रोड कोल्हापूर.